# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ४० | बुधवार,दि.१० सप्टेंबर २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# मंत्रालयात मुलाखत घेऊन लाखोंनी गंडवले



**मुंबई:-** नोकरी मिळून देण्याचे आमीष दाखवून फसवणुकीचे प्रकरण अनेकदा आपल्यासमोर येतात. मात्र कुठे इकडे तिकडे नव्हे तर चक्क मुंबईच्या मंत्रालयात बनावट आयकार्डच्या आधारे प्रवेश मिळवत मुलाखती घेऊन काही तरुणांना फसवल्याचा अनोखा प्रकार समोर आलेला आहे. यामुळे मंत्रालयातील सुरक्षा आणि व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

मंत्रालयात कनिष्ठ लिपिक पदाची नोकरी लावून देण्यासाठी सात आरोपींनी मंत्रालयात मुलाखत घेऊन ९ लाख ५५ हजार रुपये घेऊन फसवणूक केली. यातील एका आरोपीला अटक करण्यात आली, तर तीन अद्याप फरार असून, दोर्षीना त्वरित अटक करून आपणास न्याय देण्याची मागणी राहुल तायडे यांनी पत्रकार परिषदेत केली.

लॉरेन्स हेनरी (४५, रा. अष्टविनायक लॉनजवळ, म्हाळगीनगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर शिल्पा उदापुरे (४०, रा. अष्टविनायक लॉनजवळ, म्हाळगीनगर), वसंतकुमार ऊर्फ वसंतराव उदापुरे (६०, रा. पंचतारा हाऊसिंग सोसायटी, नरेंद्रनगर) आणि विजय पाटनकर (४०), नितीन साठे (४१), सचिन डोळस (४५) आणि बाबर नावाचा शिपाई (५५) अशी फरार आरोपींची नावे आहेत.

राहुल तायडे (रा. सुगतनगर नारी रोड, जरीपटका) हे नोकरीच्या शोधात होते. तेवढ्यात त्यांच्या मित्रासोबत आरोपी लॉरेन्स हेनरी त्यांच्या घरी आला. त्याने मंत्रालयात कनिष्ठ लिपिकाची नोकरी लावून देतो, अशी बतावणी करून वेळोवेळी तायडे यांच्याकडून ९ लाख ५५ हजार रुपये घेतले. त्याने तायडे यांची मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय तपासणीदेखील केली. त्यानंतर मुंबईच्या मंत्रालयात आरोपी शिल्पा उदापुरेच्या नावाची पाटी लावलेल्या कॅबिनमध्ये तायडे यांची मुलाखतदेखील आरोपींनी घेतली. परंतु, आरोपींनी २०१९ मध्ये पैसे घेऊनही जॉइनिंग लेटर न दिल्यामुळे हा प्रकार समोर आला. मात्र तगादा लावून आयकार्ड सुद्धा दिले. हे आयकार्ड दाखविल्यानंतर मंत्रालयात सहज प्रवेश मिळत होता. परंतु, अनेक दिवस होऊनही आरोपींनी नोकरीवर रुजू करून न घेतल्यामुळे तायडे यांनी हुडकेश्वर ठाण्यात तक्रार दिल्यानंतर यातील आरोपी हेनरीला मागील आठवड्यात मुंबईतून अटक करण्यात आली. फसवणुकीतील सहा आरोपी अद्याप फरार असून, त्यांना अटक करून आपणास न्याय देण्याची मागणी तायडे यांनी पत्रकार परिषदेत केली.

**मंत्रालयातील अधिकाऱ्यांचे लागेबांधे**

मंत्रालयात आरोपींनी आपल्या नावाची पाटी लावून तेथे मुलाखत घेतल्याचे चंद्रपूरमध्ये झालेल्या पोलिस तक्रारीतून सिद्ध झाले आहे. यामुळे यात मंत्रालयातील बडे अधिकारीदेखील सामील असल्याची दाट शक्यता आहे. नागपुरातदेखील मंत्रालयातील काम करून देतो, अशी बतावणी करीत पैसे घेऊन मुंबईच्या चकरा मारणाऱ्या दलालांची संख्या वाढली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी केल्यास मोठे रॅकेट उजेडात येण्याची शक्यता आहे.

**शेकडोंच्या फसवणुकीची शक्यता**

आरोपींनी महाराष्ट्रात २०० च्या वर बेरोजगारांची फसवणूक केल्याची शक्यता तायडे यांनी पत्रकार परिषदेत वर्तविली. यातील फसवणूक झालेल्या चार जणांनी आतापर्यंत हुडकेश्वर, चंद्रपूर आणि वर्धा येथील पोलिस ठाण्यात तक्रारी केल्या असून, हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# ओबीसी समाज न्यायालयीन लढाईसह आता रस्त्यावरचीही लढाई लढणार

## विदर्भातील ओबीसी संघटनांनी घेतला पुढाकार

**नागपूर :-** राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यासाठी काढलेल्या पहिल्या शासन निर्णयात पात्र असा शब्द वापरला होता. नंतर दुसरा शासन निर्णय काढून हा शब्द काढून टाकण्यात आला. याचा अर्थ मराठा समाजाला ओबीसींतून सरसकट आरक्षण देणार असा होतो. हा मूळ ओबीसी समाजावर अन्याय आहे. याविरोधात ओबीसी समाज दोन स्तरावर लढाई लढेल. पहिली लढाई न्यायालयीन स्तरावर लढली जाईल. विदर्भातून आमची वकील संघटना पूर्ण ताकदीने न्यायालयात बाजू मांडेल. त्यांना आमचा पूर्ण पाठिंबा राहील. तर दुसरा लढा रस्त्यावर दिला जाईल. लढा देण्यासाठी २५ प्रमुख लोकांची एक समिती गठित करून ऑक्टोबरमध्ये नागपुरात ओबीसींचा महामोर्चा काढणार, अशी घोषणा ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

रविभवन येथे शनिवारी विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यातील ओबीसी संघटनांची बैठक झाली. या बैठकीत मार्गदर्शन करीत असताना वडेट्टीवार बोलत होते.

व्यासपीठावर आमदार अभिजित वंजारी, माजी खासदार खुशाल बोपचे, ओबीसी नेते शेखर सावरबांधे, ओबीसी अभ्यासक नागेश चौधरी, ओबीसी नेते ईश्वर बाळबुधे, दिवाकर गमे, ओबीसी नेते ज्ञानेश वाकुडकर, ॲड. किशोर लांबट, ॲड. पुरुषोत्तम सातपुते, बळीराज धोटे, इलमे सर, गोपाल सेलोकर, बाळकृष्ण सार्वे, ॲड. अंजली साळवे, ॲड. समीक्षा गणेशे, बबलू कटरे, खेमेंद्र कटरे, गुरुदास येडेवार, सावन कटरे, विलास काळे, रमेश पिसे, अनिल डहाके,सतीश मालेकर, डॉ. संजय घाटे, डॉ. गावतुरे आणि ओबीसी युवा अधिकार मंचचे उमेश कोर्राम यांच्यासह विदर्भातील सर्व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

तीन तास चाललेल्या या मॅरेथॉन बैठकीत संघटनांच्या नेत्यांनी मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यासंदर्भात स्पष्ट विरोध दर्शविला. मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने काढलेल्या शासन निर्णयातून ओबीसींचे नक्कीच नुकसान होणार आहे. २७ टक्के आरक्षणातून १३ टक्के आधीच वजा होते. उरलेल्या १९ टक्क्यांतही मराठा समाजाला आरक्षण दिल्यास ओबीसींना किती उरणार? आपला हक्कच संपून जाणार, असा धोकाही वडेट्टीवार यांनी वर्तविला. कुणी कुठल्याही पक्षाचा असला तरी आपल्यासाठी झटणाऱ्याला साथ द्या, असे आवाहनही त्यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आरक्षणाला विरोध आहे. त्यांच्या विचारसणीचे लोक सत्तेत आहेत. त्यांच्याकडून आपण ओबीसी आरक्षणाला धक्का न लागू देण्याची अपेक्षा कशी करू शकतो? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. आज आपण न्यायालयीन लढाई न लढल्यास ओबीसींना मोठा धक्का बसणार आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण संपविण्याचा त्यांचा डाव असल्याचा धोकाही वडेट्टीवार यांनी वर्तविला.



### १२ सप्टेंबरला कृती समितीची

**नागपुरात येत्या १२ सप्टेंबरला प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक होणार आहे. या बैठकीत मराठा आरक्षणासंदर्भात जाहीर शासन निर्णयावरील लढाईच्या अनुषंगाने व्यूहरचना निश्चित होईल. या बैठकीतच महामोर्चाची तारीखसुद्धा जाहीर केली जाईल.**

## शेतकऱ्यांच्या खात्यात १८९२.६१ कोटी रुपये

गोंदिया : ङ्गशेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ङ्गनमो शेतकरी महासन्मान किसान योजनेफ्चा सातवा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण १८९२.६१ कोटी रुपये निधी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होईल.मंत्रालय येथे ङ्गनमो शेतकरी महासन्मान निधी योजनेफ्च्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा निधी वितरित करण्यासाठी कृषी विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कृषी मंत्री दत्तात्रय भरणे मंत्रीमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेशकुमार उपस्थित होते.

# साकोलीत निघाली “ओबीसी आरक्षण बचाओ रॅली”



**साकोली :-** नुकतेच महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाला आरक्षण देऊ केले. याने ओबीसी समाजातील बांधवामध्ये भयंकर असंतोष पसरला. सर्व ओबीसी बहुजन समाजाच्या वतीने ओबीसी आरक्षणावर होत असलेल्या अन्यायाचा विरोधात ०९ सप्टें. श्री संत लहरीबाबा मठ देवस्थान येथून “ओबीसी आरक्षण बचाओ रॅली” काढण्यात आली.या रॅलीमध्ये ओबीसी बहुजन समाजातील बांधवांनी आपल्या न्याय हक्कासाठी व संघर्षाच्या “आर या पार” “उठ ओबीसी जागा हो, आंदोलनाचा धागा हो” या घोषणा देत साकोलीतील राष्ट्रीय महामार्ग गजबजून सोडला.ओबीसी समाजामध्ये मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देऊन राज्यातील सरकार घुसखोरी करण्याचा जो निर्णय घेतला आहे.त्या निर्णयाचा जाहीर निषेध नोंदवित ओबीसी समाजविरोधी भूमिका घेणाऱ्या समाजातील नेत्यांनाही यावेळी इशारा देण्यात आला.

# आदिवासी विकास महामंडळाला २९ कोटीची निधी

## आमदार राजकुमार बडोले यांचा पाठपुरावा



**गोंदिया :-** रब्बी हंगामाच्या धान खरेदी आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग फडेरेशनच्या वतीने जिल्ह्यात करण्यात आली. मात्र निधी अभावी आदिवासी विकास महामडळाला धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांचे चुकारे अडकले आहेत, यामुळे जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. यासाठी आमदार राजकुमार बडोले यांनी आदिवासी विकास महामंडळ व पणन विभागाशी पाठपुरावा केला. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळाला २९ कोटीची निधी देण्यात आला आहे. तसेच उर्वरित ८५ कोटीची निधीही लवकरच देण्यात येणार आहे. यासाठीही आमदार बडोले विभागाशी पाठपुरावा करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यात चुकारे जमा होणार आहेत.

आदिवासी विकास आधारभूत महामंडळाकडून किंमतीमध्ये धान खरेदी करण्यात आली. रब्बी हंगाम २०२४-२५ मध्ये १४.७० लाख क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट मिळाले होते. त्यानुसार १५१ कोटी ३९ लाख रुपयाचे धान खरेदी करण्यात आले. मात्र निधी अभावी शेतकऱ्यांची चुकारे अडकले होते. यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. आमदार राजकुमार बडोले यांनी आदिवासी विकास महामंडळ, पणन विभाग तसेच मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेवून या संदर्भात पाठपुरावा केला. दरम्यान पणन विभागाने महामंडळाला २९ कोटीची निधी वळती केली आहे. यामुळे काही शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात येणार आहेत. व बरोबर उर्वरित ८५ कोटीची निधी देखील लवकर आदिवासी विकास महामंडळाला वळती करण्यात येणार असल्याचे आश्वासन आमदार राजकुमार बडोले यांना देण्यात आले. त्याच बरोबर खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात राज्य व केंद्र सरकारशी धान खरेदीचे उद्दिष्ट वाढविण्याच्या संदर्भात आमदार राजकुमार बडोले यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू केला आहे.

यामुळे उद्दिष्टतही वाढ होण्याची आशा पल्लवित झाली आहे. परिणामी ज्या शेतकऱ्यांचे धान घरी किंबहुना केंद्रात पडून आहेत. त्या शेतकऱ्याच्या धानही उद्दिष्ट वाढीमुळे खरेदी करण्यात येणार आहेत. आमदार राजकुमार बडोले यांच्या पाठपुराव्याला यश आल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# ना कॅन्टीन, ना पोलिस सुरक्षा;बाजार समितीत शेतकऱ्यांची उपेक्षा

**गोंदिया:-** जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजार समिती म्हणून गोंदिया शहरातील बाजार समिती ओळखली जाते. कोट्यधीश असलेल्या बाजार समितीवर गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासकराज होता. दोन वर्षांपूर्वी संचालकमंडळ आले. मात्र दोन वर्षांचा काळ लोटल्यानंतर देखील बाजार समितीत समस्यांचा अंबार आहे. पोलिस चौकी असून कर्मचारी नाहीत, तर कॅन्टीनचे कंत्राट मिळून देखील कॅन्टिन सुरू झाले नाही. त्यातच शेतकऱ्यांची लूट देखील होत असल्याची ओरड आहे.

गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सर्वात मोठी संघटना असलेल्या गोंदिया कृषी उत्पादन बाजार समितीचा सर्वांगीण विकास करण्याचे आश्वासन देऊन सध्याचे संचालक मंडळ २ वर्षांपूर्वी सत्तेवर आले होते. परंतु या दोन वर्षांत बाजार समितीची अवस्था अधिकच बिकट असल्याचे दिसून येते. बाजार समितीत शेतीमाल विकण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी शेतकरी विश्रामगृह बांधण्याचे आश्वासन देण्यात आले होते, परंतु अद्यापपर्यंत विश्रामगृहाचे कोणतेही चिन्ह दिसत नाही. यासोबतच बाजार समितीच्या विविध समस्यांपैकी, कोट्यवधी रुपये खर्चुन नवीन भाजीपाला बाजार (गोशाळा वॉर्ड) बांधण्यात आला आहे. परंतु छोटा भाजीपाला बाजार अद्याप सुरू झालेला नाही. ज्यामुळे आजही सामान्य नागरिकांना पावसात घाणीच्या वातावरणाचा सामना करावा लागतो आणि महिलांची देखील मोठी कुचंबना होत आहे.




### जवळच्या व्यक्तीला कॅन्टीनचे कंत्राट

**सध्याच्या संचालक मंडळात असलेल्या एका संचालकाने त्याच्या वैयक्तिक स्वार्थासाठी त्याच्या मित्राला अनधिकृतपणे कॅन्टीनसाठी जागा दिली आहे. परंतु ती कॅन्टीन अद्याप सुरू झालेली नाही. कंत्राट मिळाल्यानंतर दोन वर्षांपासून भाडे देखील बाजार समितीला मिळालेले नाही. कॅन्टीनच्या नावाखाली शेतकऱ्यांना फक्त लॉलीपॉप दिले जात आहेत.**

### काटी पशु बाजारात बेकायदेशीर वसुली

**विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कृषी उत्पादन बाजार समिती गोंदिया द्वारे चालवल्या जाणाऱ्या काटी येथील जनावरांच्या बाजारात बेकायदेशीर वसुली केली जात आहे. समितीमार्फत खरेदी-विक्रीवर आकारण्यात येणाऱ्या कराची पावती देखील नियमापेक्षा जास्त रुपयांची देण्यात येत असल्याचा आरोप होत आहे. बाजार समिती अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात व्यवहार करण्यात आला असून, वैयक्तिक स्वार्थासाठी नियमबाह्य भरती करण्यात आली.**

कॅन्टीनची अव्यवस्था, गुरांच्या बाजारात मनमानी वसुली आणि कर्मचाऱ्यांच्या भरतीत अनियमितता हे मुख्य मुद्दे सध्या ज्वलंत आहेत. शेतकऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या बाजार समितीतच शेतकऱ्यांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. सत्तेत असलेल्या विद्यमान संचालक मंडळाने त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात मनोहर भाई पटेल यार्डात नवीन किसान शेतकरी विश्राम गृह बांधण्याचे आश्वासन दिले होते. परंतु २ वर्षात, विश्राम गृहाचे बांधकाम कुठेही दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळेल तिथे मोकळ्या जागेत विसावा घ्यावा लागत आहे. कृषी उत्पादन बाजार समिती मनोहर भाई यार्डमध्ये शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिस चौकी सुरू करण्यात आली होती,परंतु त्या चौकीत पोलिस कर्मचारी देण्यात आलेले नाहीत. त्याचबरोबर बाजार समितीने नियुक्त केलेले सुरक्षा कर्मचारीही गायब आहेत. परिणामी शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे उत्पादन आणि त्यांची सुरक्षा धोक्यात आहे. सोबतच चोरी आणि दरोड्याच्या घटना दररोज घडत आहेत. सध्याच्या संचालक मंडळाने सत्तेत येण्यासाठी विविध आकर्षक आश्वासने दिली. पण दोन वर्षांत शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या हितासाठी दिलेली आश्वासने विसरले आहेत.

# गोंदियावरून दिल्ली विमानसेवा लवकरच

## इंदूरनंतर १६ सप्टेंबरपासून बंगळुरूलाही सुरू होणार

**गोंदिया:-** तालुक्यातील बिरसी येथील विमानतळावरून सध्या इंडिगोची गोंदिया-हैदराबाद-तिरुपती ही विमानसेवा सुरू आहे. यानंतर येत्या १६ सप्टेंबर २०२५ पासून गोंदिया-इंदूर-बंगळुरू या मार्गावर प्रवासी विमानसेवेला प्रारंभ होणार आहे, तर गोंदिया-दिल्ली प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करण्यासाठी बालाघाटचे खा. भारती पारधी यांच्या मागणी पत्रानंतर केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांनी अनुकूलता दर्शविली आहे. त्यामुळे या मार्गावर गोंदियाहून प्रवासी विमानसेवेला प्रारंभ होणार आहे. गोंदिया आणि शेजारील मध्यप्रदेशच्या बालाघाट जिल्हावासींसाठी ही दिलासादायक बाब आहे.

गोंदिया तालुक्यातील बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ तत्कालीन केंद्रीय विमान वाहतूक मंत्री प्रफुल्ल पटेल यांच्या पुढाकाराने उभारण्यात आले. यानंतर सन २०२२ मध्ये फ्लाय बिग या कंपनीने गोंदिया-इंदूर या प्रवासी विमान वाहतूक सेवेला सुरुवात केली होती. त्यावेळी प्रवाशांचासुद्धा चांगला प्रतिसाद मिळाला होता. पण काही तांत्रिक अडचणीमुळे ही सेवा वर्षभराच्या आतच बंद करण्यात आली. यानंतर गेल्या

वर्षीपासून इंडिगो विमान कंपनीने बिरसी विमानतळावरून गोंदिया-हैदराबाद-तिरुपती या मार्गावर विमानसेवा सुरू केली. त्याला प्रवाशांचा योग्य प्रतिसाद मिळत आहे. यानंतर आता स्टार एअर कंपनीने या विमानतळावरून गोंदिया-इंदूर-बंगळुरू या मार्गावर १६ सप्टेंबरपासून प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचे वेळापत्रकसुद्धा कंपनीने जाहीर केले.

पूर्वी केवळ गोंदिया-इंदूर विमानसेवा सुरू करण्यात येणार होती. पण स्टार एअर कंपनीने आता गोंदिया-इंदूर-बंगळुरू या मार्गावर सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुलळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

### गोंदिया-दिल्ली विमानसेवेसाठी बालाघाटच्या खासदारांचा पुढाकार

**गोंदिया जिल्ह्याला मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्याची सीमा लागून आहे. या दोन्ही राज्यातील प्रवाशांसाठी गोंदिया येथील विमानतळ सोयीस्कर आहे. त्यामुळे गोंदिया-दिल्ली या मार्गावर प्रवासी विमान वाहतूकसेवा सुरू करण्यासाठी बालाघाटच्या खा. भारती पारधी यांनी पुढाकार घेत केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांची भेट घेऊन त्यांना याबाबतचे निवेदन दिले. यावर केंद्रीय विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजरापू यांनीसुद्धा अनुकूलता दर्शविल्याची माहिती आहे. त्यामुळे लवकरच थेट गोंदियाहून दिल्लीला उड्डाण घेणे शक्य होणार आहे. यामुळे गोंदिया, बालाघाट (म. प्र.). राजनांदगाव (छत्तीसगड) या जिल्ह्यातील उद्योगाला चालना मिळण्यास मदत होणार आहे**




### विमानसेवेचे असे आहे वेळापत्रक

**बंगळुरूहून दुपारी २. ३० वाजता विमान इंदूरसाठी उड्डाण घेईल. दुपारी ४.३० वाजता इंदूरला पोहोचेल. इंदूरहून सायंकाळी ५ वाजता गोंदियासाठी उड्डाण भरेल आणि गोंदियाला सायंकाळी ५.५५ वाजता पोहोचेल. गोंदियाहून सायंकाळी ६.२५ वाजता इंदूरसाठी उड्डाण भरेल व सायंकाळी ७.२० वाजता इंदूरला पोहोचेल. सायंकाळी ७.५० वाजता बंगळुरूसाठी उड्डाण भरेल व रात्री ९.४५ वाजता बंगळुरूला पोहोचणार आहे.**

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी आंदोलन




**गोंदिया:-** ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या समस्या अद्यापही कायम आहेत. टप्प्या टप्प्याने कर्मचारी आंदोलन करीत आहेत. त्याच अनुषंगाने ८ सप्टेंबरपासून सातारा येथे कर्मचाऱ्यांचे राज्यव्यापी आंदोलनाचा तिसरा टप्पा सुरू झाला आहे. याआंदोलनात गोंदिया जिल्ह्यातील सुमारे ३०० कर्मचारी सहभागी झाले आहेत.

यावलकर समितीच्या सीफारसी मान्य करून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करा, वेतनासाठीअसलेली करवसुली व उत्पन्नाची जाचक अट रद्द करा. शासनाने मान्य केलेल्या मांगण्यांची त्वरित पूर्तता करा, लोकसंख्येच्या आकृतिबंधाची जाचक अट रद्द करा, किमान वेतनाची प्रभावी अंमलबजावणी करा, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना पेन्शन चा कायदा लागू करा, जिल्हापरिषद अंतर्गत १०टक्के भर्ती तात्काळ करा, आनलाईन वेतनप्रणाली पूर्ववत करा व इतर मागाण्यांना घेवून राज्यव्यापी आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात ८ जुलैला राज्यातील सर्व कलेक्टरवजि. प. वर कार्यालयावर नंतर १८ ऑगस्टला विभागीय आयुक्त कार्यालयावर मोर्चा धरणे आंदोलनाची शासनाने दखल घेतली नाही म्हणूनच ८ सप्टेंबर पासून सातारा येथे ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांचे संपर्क कार्यालयावर आंदोलनाला सुरुवात झाली आहे.

महासंघाचे अध्यक्ष प्रा. तानाजी ठोंबरे, सरचिटणीस कॉ. नामदेव चव्हाण व कार्याध्यक्ष कॉ. मिलिंद गणवीर यांचे नेतृत्वात बेमुदत धरणे आंदोलनात सहभागी झाले असून जिल्ह्यातील सुमारे ३०० कर्मचारी सहभागी झाल्याची माहिती गणविर यांनी दिली आहे.

## संपादकीय

# किलाडी आणि वैदिक संस्कृति...

अलिकडेच किलाडी हे नाव कदाचित तुमच्या कानावर पडलं असेल, काही तुम्ही वाचलंही असेल. हा विषय वाटतो तितका सोपा नाही आणि लगेच झटकून टाकावा असाही नाही, जरी तो इतिहासाशी संबंधित असला तरीही. सध्या आपण सारे तसेही इतिहासातच जगत असतो. प्रधानमंत्री हे नेहरूंच्या काळात जगत असतात आणि सामान्य हिंदूडे हे रामायण काळात जगत असतात. असो. आपण मात्र इतिहासाचा वेध घेतांनाही वर्तमानातच जगत राहूया. तर किलाडी. तामिळनाडूतील मदूरई शहरानजिक, वैगेई नदीवर हे गाव आहे, जिथे भारतीय पुरातत्त्व खात्याने २०13 पासून उत्खनन सुरू केलं होतं. त्यात काही विलक्षण गोष्टी हाताशी लागल्या. एक अख्खं शहर तिथं गवसलं आहे. अगदी सुनियोजीत असं. सिंधू संस्कृतितील सुसज्ज नगरांची आठवण करून देणारं. सिंधू संस्कृतिची अनेक वैशिष्ट्ये तिथं आढळली आहेत. विशिष्ट प्रकारची भांडी, मणी इत्यादी. मुख्य म्हणजे तिथं कोणत्याही धार्मिक खूणा आढळल्या नाहीत, जसं सिंधू संस्कृतित आहे. तामिळनाडूत संगम साहित्य (३०० इसवीपूर्व ते ३०० इसवीसन) फार महत्त्वाचं मानलं जातं आणि ते वैदिक संस्कृतिचं समकालीन किंवा त्याही आधीचं असल्याचा दावा केला जातो. किलाडी हे त्या संगम साहित्यातील प्रत्यक्ष पुरावा आहे असं उत्खनन करणाऱ्या लोकांचं म्हणणं होतं आणि आहे. त्यातला प्रमुख आवाज होता अमरनाथ रामकृष्ण यांचा जे इथले प्रमुख होते. त्यांनी त्यांच्या अहवालात म्हटलं की हे नगर किमान ८०० इसवीपूर्व मधलं आहे. म्हणजे आजपासून तब्बल २८०० वर्षं जुनं. इथंच सारा वाद सुरू झाला. भारतीय पुरातत्त्व खात्याच्या म्हणजे एएसआयच्या वरिष्ठांनी रामकृष्ण यांना हा अहवाल व त्यातली ही तारीख बदलायला सांगितली. त्यांनी नकार दिल्यावर त्यांची बदली करण्यात आली. मग यात तामिळनाडू सरकारने उडी घेतली. त्यांनी केंद्र सरकारवर आरोप केला की त्यांना द्रविड संस्कृतिचं प्राचीनत्व मान्य नाही आणि वैदिक संस्कृतिपेक्षा ती जुनी आहे हे देखील. केंद्र सरकारने यात सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. मध्यंतरी प्रधानमंत्री तामिळनाडूत जाऊन संगम साहित्याविषयी चार शब्द बोलूनही आले. पण त्यानं फरक पडला नाही. प्रत्यक्षात एएसआयने किलाडीवरील अनेक अधिकाऱ्यांची इतरत्र बदली केली.

हे सारं वाचून तुम्हाला प्रश्न पडला असेल की याचा आपल्याला नक्की काय उपयोग आहे. ही गोष्ट आपल्यासाठी का महत्त्वाची आहे. आहे. काही गोष्टी आधी लक्षात घ्या. भारतात साधारणपणे १ लाख वर्षांपूर्वीपासून मूळ मानवी वस्तीचे अवशेष आढळतात. ६५ हजार वर्षांपूर्वी आफ्रिकेतील काही स्थलांतरीत लोकही इथे आले. हे पहिले स्थलांतरित होते. भीमबेटका इथे ज्या गुहा आहेत त्यावर १० हजार वर्षांपूर्वीच्या लोकांनी काढलेली भित्ती–चित्रे आहेत. ७ हजार वर्षांपूर्वी इथे शेती सुरू झाली. याच दरम्यान इराणमधून काही शेतकरी सिंधूच्या काठी राहायला आले. त्यांच्याकडे प्रगत शेतीतंत्र होतं. त्याच्या जोरावर त्यांनी इथं प्रचंड मोठी वस्ती उभारली, तिच आपली सिंधू संस्कृति आहे. जी तब्बल १० लाख चौरस किलोमीटर भागात म्हणजे भारताच्या एक–तृतियांश भागात पसरली होती. या काळात जी नागरी वस्ती उभी राहिली तिचा काळ होता २६०० ते १९०० इसवीपूर्व. या सातशे वर्षांत ही संस्कृति बहरली आणि विस्तारली आणि मग लयास गेली. ही आपली संस्कृति आहे असं मी म्हणतो कारण हेच लोक आहेत ज्यांना वैदिकांनी असूर, राक्षस, दैत्य, दानव, दास, शूद्र म्हणून कलंकित केलं. हे आपले खरे पूर्वज आहेत इथल्या सिंधूजनांचे ज्यांना आज आपण बहुजन म्हणतो. सिंधूच्या लयानंतर हे लोक भारतात सगळीकडे पसरले आणि त्यांचा मोठा जमाव दक्षिण भारतात येऊन वसला. हे का झालं. कारण १७०० इसवीपूर्व पासून भारतात आर्यांच्या टोळ्या यायला सुरूवात झाली होती. १२०० इसवीपूर्व पर्यंत ते येत राहिले. हे स्थलांतर असलं तरी इथ आल्यावर त्यांनी स्थानिक सिंधूजनांवर आक्रमणं करून त्यांना परास्त केलं. हे सारं झालं साधारणपणे १५०० ते ५०० इसवीपूर्व या काळात. हा हजार वर्षांचा काळ अंधारयुग म्हणून ओळखलं जातं कारण याविषयी आपल्याला नक्की काहीच माहिती नाही. मग बुद्धापासून आपला इतिहास सलग सुरू होतो. मधल्या काळात वेद, उपनिषदे, यांची रचना झाली, त्यात ज्या काही गोष्टी आहेत त्यांच्याविषयी कोणतीही सत्यता सांगता येत नाही. फक्त एक सोडून की या आर्यांनी इथल्या सिंधूजनांचा कपटाने पराभव केला आणि त्यांना एकतर आपल्यात सामिल करून घेतलं, किंवा गुलाम केलं किंवा त्यांना शूद्र असूर राक्षस म्हणत कायमचं कलंतिक केलं. आपण स्वतः आपल्या या पूर्वजांना अजूनही त्याच पद्धतीने मानतो.

आपला सारा तथाकथित इतिहास हा महाभारत आणि रामायण या काल्पनिक काव्यांवर रचलेला आहे. जो खरा आहे असं सध्याच्या हिंदूड्यांना वाटतं. प्रत्यक्षात वैदिकांनी व त्यानंतर ब्राह्मणांनी जे यांच्यातूनच निर्माण झाले होते, त्यांनी अत्यंत विकृत इतिहास रचला आहे. त्याला सत्याचा कोणताही आधार नाही. तरीही महाभारत व रामायण हे खरेच आहे असं समजून सगळीकडे उत्खननं सुरू आहेत, हे अर्थात भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर सुरू झालं. अजूनही ते सुरू आहे. मध्यंतरी लोकसभा निवडणूकीच्या आधी मोदी कृष्णाच्या तथाकथित द्वारकेत बुडी मारून आले होते. ही द्वारका सिंधू संस्कृतिची असण्याची शक्यता जास्त आहे. आणि कृष्णही सिंधूजनच आहे ज्याला नंतर वैदिकांनी आपल्यात हडप केलं आणि त्याच्या नावावर गीतेमधून सिंधूजनांवर आपल्या जातिव्यवस्थेच्या हिडीस कल्पना लादल्या. आज हिंदू ज्यांना आपले देव म्हणतात ते सारे मूळात नंतरच्या काळातील सिंधूजनांचे शूर–वीर लोकच आहेत किंवा मूळ स्थानिक लोकांपैकी आहेत. शंकर, गणपति, विष्णू, राम आणि कृष्णसुद्धा. दुसऱ्याच्या गोष्टी हडपून त्या आपल्या आहेत हे सांगण्यात वैदिक–ब्राह्मण पटाईत होते. त्यांनी बुद्धालाही आपला म्हणून दशावतारात सामिल करून घेतलं. हजार वर्षांचं जे अंधारयुग आहे त्यात हा सारा घोटाळा त्यांनी केला आहे. नंतर तर त्याला अतोनात उत आला जेव्हा पुराणं रचायला सुरूवात झाली. पहिल्या सहस्त्रकात रामायण, महाभारत व पुराणे, ब्राह्मण ग्रंथ, स्मृति वगैरे रचण्यात आल्या. त्यात निव्वळ ढापाढापी आहे. सत्य आहे पण ते अगदी रसातळाला भिडलेलं आहे. वैदिकांना कधीही मोठ्या नगरी उभारता आल्या नव्हत्या. कारण ते पशूपालक होते. भटके होते. त्यांना खाणंपिणं मजा करणं इतकंच जमत होतं. पण ते अत्यंत कपटी, क्रूर, अप्रामाणिक होते ज्याच्या जोरावर सिंधूजनांचा त्यांनी सातत्याने पराभव केला. याच्या कथा ऋग्वेदात आणि पुराणांमध्ये ठासून भरलेल्या आहेत. ज्या नगरी उभ्या राहिल्या त्या ५०० ते ३०० इसवीपूर्व मध्ये उभ्या राहिल्या ज्या सिंधूजनांच्याच होत्या. पण आज जणूकाही रामायण महाभारत खरोखरच घडलं होतं अशा आविर्भावात ब्राह्मण आणि ब्राह्मणी वृत्तीचे बाटगे सिंधूजन बरळत असतात. महाराष्ट्रातही सिंधूतील लोक आले. जे नाग होते. महार आणि रट्ठ (मराठे) गणाचे लोक इथे आले राहिले व त्यामुळे या जागेला महाराष्ट्र हे नाव प्राप्त झालं. आणखी खाली द्रविड संस्कृति उभी राहिली. जी मूळ सिंधू संस्कृतिचीच शाखा आहे. किलाडीला २८०० वर्ष जुनं शहर सापडलं याचा अर्थ वैदिकांच्या आधीच द्रविड संस्कृति बहरली होती असा त्याचा अर्थ होतो जो वैदिकांना मान्य होण्यासारखा नाही. आर्याभिमानी ब्राह्मणांना मान्य होण्यासारखा नाही. त्यातही उत्तर भारतियांना मान्य होण्यासारखा नाही जिथं वैदिकांनी आपलं बस्तान बसवलं होतं व आहे. आपल्याला हा संपूर्ण इतिहास पुन्हा एकदा अतिशय काळजीपूर्वक बघावा लागेल, तपासावा लागेल. मुख्य म्हणजे १५०० ते ५०० इसवीपूर्व दरम्यान नक्की काय घडलं हे शोधून काढावं लागेल. वैदिक–ब्राह्मण खोट्याचं खरं कसं करतात याचं उदाहरण म्हणजे काशी किंवा वाराणशीचं आहे. शंकराचं शहर म्हणून त्याला ओळखलं जातं व ते ३००० वर्ष जुनं आहे असं सांगितलं जातं. म्हणजेच वैदिकांचं ते शहर आहे असं. प्रत्यक्षात याचे कोणतेही पुरावे तिथं आढळत नाहीत. १६ व्या शतकापासून हे शहर भारतातील पवित्र धार्मिक शहर म्हणून प्रसिद्ध पावू लागलं आणि त्यासाठी तिथल्या भूमिहर ब्राह्मणांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी मुघल, राजपूत, मराठा व ब्रिटीशांची मदत घेतली. संस्कृत कोणालाच तेव्हा आणि आताही समजत नसल्यामुळे ब्राह्मणांनी हवं ते लिहीलं आणि तेच खरं आहे असं सामान्य जनतेला सांगत त्यांची फसवणूक केली. मणिकर्णिका घाटावर मेलेला माणूस थेट मोक्ष मिळवतो ही गप्प याच काळात भारतभर पसरवण्यात आली. त्यासाठी पुराणांचे दाखले देण्यात आले. पुराणांचा काळ हा ३०० ते १४०० इसवीसणातला आहे. ही अत्यंत थोतांड भरलेली पुस्तकं आहे ज्याला इतिहास समजला जातो. त्याचा पगडा इतका आहे की अनुराग ठाकूर बरळतो की हनुमान हा पहिल अतंराळवीर होता, आणखी कोणी म्हणतो की आमच्याकडे अण्वस्त्रे होती, आणि ही यादी मोठी आहे. भाकडकथांना इतिहास समजून तो इतरांवर लादून सत्ता मिळवण्याचा प्रकार भाजपनं केला आहे. दुर्दैवानं आपली अक्कल न वापरता सिंधूजनही त्याला बळी पडत आहेत. यातून बाहेर पडण्याची गरज आहे. ब्राह्मण्याचं जे विष मनात भिनलं आहे लोकांच्या त्यातून मुक्त होण्याची गरज आहे. आपला इतिहास कसाही असो तो स्विकारण्याची आपली ताकद असली पाहिजे. खोट्या नाट्या गोष्टी सांगण्याची काही गरज नसते. आता आपण सारे भारतीयच आहोत. मग कोणत्याची जाति–धर्माचे का असेना त्यानं काही फरक पडायला नको. पण आपला खरा इतिहास समजून घेऊन वर्तमानात अधिक माणूसपणानं कसं वागता येईल आणि त्याच बरोबर आपल्या पूर्वजांवर जो अन्याय झालेला आहे त्याचं परिमार्जन कसं करता येईल याचीही आपल्याला काळजी घ्यावी लागेल. किलाडी ही त्याची सुरूवात आहे. डाव्या किंवा उजव्या इतिहासापासून दूर जात, सम्यक अथवा मध्यम मार्गाचा इतिहास, खरा इतिहास शोधणं आपलं काम असायला हवं. जे स्वतःला केवळ माणूस समजतात, भारतीय समजतात, सिंधूजन समजतात त्यांनी यासाठी पुढाकार घ्यायला पाहिजे. मी काही ब्राह्मणांच्या विरोधात नाही, पण मी ब्राह्मणी वृत्तीच्या विरोधात आहे. याची इथं आठवण अर्थातच करून देतोय. ही विषारी वृत्ती आपल्यातून मनातून, विचारातून, आचारातून उपटून टाकावी लागेल तरंच आपण देश म्हणून अधिक एकसंध होऊ शकू.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शेतकरी जागा झाल्याशिवाय शोषण थांबणार नाही



"शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार नाही, नुकसान सहन करण्याची सवय करा." असंवेदनशील वृत्तीचे द्योतक हे वचन. शेतकऱ्याचा सण पोळा. ऐन पोळ्याच्या पर्वावर निर्ढावलेले पुढारी शेतकऱ्यांच्या जखमेवर मिठ चोळण्यासारखे टिप्पणी करतात. तिकडे आधीच पिकांना भावाची हमी नाही आणि वरुन कापसावरील आयात शुल्क काढल्यामुळे देशा–तील शेतकऱ्यांच्या कापसाला सपाटून मार बसेल अशी शक्यता निर्माण झाली आहे. हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या पोटावर पाय, आणि राजकीय धुरीण शेतकऱ्यांना सहनशीलतेचे धडे शिकवतात.

**आयात का करता? आपल्याकडे कापूस कमी आहे का?**

आपल्याकडे एखादी वस्तू नसेल किंवा कमी प्रमाणात असेल तेव्हा आपण ती मागवतो, खर–दी करतो. आपल्याकडे कापूस कमी पडतो का? कापूस जर कमी पिकला असता तर ,कापसाला भाव चांगले मिळाले असते.

आपल्या देशात जर कापूस उत्पादनात घट झाली असती तर कापसाला भाव जास्त मिळाले असते, आणि जास्त कापूस पिकला असता तर मग परदे–शातून आयात करावी लागली नसती. अर्थात, भारताचा कापूस उत्पादनात वरचा क्रमांक आहे. तरी कापसाची आयात का करावी लागते, तेही आयात शुल्कात घट करून, माफ करून? हा प्रश्न आहे. या देशात कापूस उत्पादन विक्रमी होत आलेले आहे आणि कापसाची प्रत उत्तम असल्यामुळे ब्रिटनसह जगातील अनेक नामवंत देशांमध्ये भारतीय कापूस निर्यात होत असल्याचा इतिहास आहे. पण वर्तमानस्थितीत कापूस शुल्क प्रकरणावरून असे दिसते की कापूस आयात निर्यात धोरणात स्वदेशी कास्तकारांचे हित पूर्णतः दुर्लक्षित आहे कापूस उत्पादन हाती येण्याच्या अगदी तोंडावर कापूस आयातीबाबतचा हा निर्णय शेतकऱ्यांच्या जीवावर उठणारा आहे. त्यामुळे शेतकरी भांबावून गेला आहे.

मागणी आणि पुरवठ्याच्या तत्त्वानुसार बाजारात एखादी वस्तू कमी प्रमाणात उपलब्ध असेल आणि मागणी जास्त असेल तर त्या वस्तूचे भाव वाढलेले असतात आणि पुरवठा जर जास्त असेल, बाजारात आवक जास्त असेल तर चांगला भाव मिळत नाही. अनेकदा टमाटर, वांगी, कोथिंबीर, पालक, मेथीच्या जुड्या रस्त्यावर फेकण्याची नौबत येते, नामुष्की ओढवते. संत्री, धान, सोयाबीन वगैरे उत्पादनही कैकदा मातीमोल दरात विकावे लागतात. तेव्हा शेतकऱ्यांना कोणतं पिक केव्हा घ्यावं हे कळत नाही म्हणून त्याचा पाणउतारा केला जातो. शेतकरी कर्जबाजारी होऊन शेती करतो, सवाई, दीढीने व्याजाबट्टयाच्या कर्जाची फरतफेड करण्याच्या घिसाडघाईनं पिक हाती येताच, बाजारत नेतात. अशा शेतकऱ्यांची संख्याही खूप असते. काहीच दिवसात अधिक प्रमाणात शेतकऱ्यांचा माल बाजारात पोहचतो. नेमका शेतकऱ्याचा माल निघाला की जो तो माल विकण्याच्या प्रयत्नात असतो, तेव्हा योग्य भावच मिळत नाही. शेतकऱ्याचा अधिकाधिक माल, दलाल, व्यापाऱ्याकडून खर–दी करण्यात आला की, शेतकऱ्याचं पिकानं भरलेलं घर रिकामं झालं, की चमत्कारिक पद्धतीने पिकांचे भाव वाढल्याचे अनेकांचे निरीक्षण आहे, शेतकऱ्यांचे वर्षानुवर्षांचे अनुभव आहेत. मागणी पुरवठा तत्त्वाचा आधार बाजाराचे ठेकेदार आपापल्या सोयीनुसार लावतात असाच याचा अर्थ निघत नाही का?

शेतकरी अनेक वर्षांपासून दरवर्षी उत्पादन खर्चावर आधारित पिकांना भाव मिळण्याची मागणी करत आहे. ती मिळत तर नाहीच पण महागाईने एव्हरेस्टचे शिखर गाठलेले असताना गेल्या दहा–पंधरा वर्षांपूर्वी जे भाव सोयाबीन, कापूस, धान वगैरे पिकांना मिळत होते त्यापेक्षा फार काही फरक पडलेला दिसत नाही. शेतीचा खर्च अवाढव्य वाढला असताना शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. घामाला दाम नाही, श्रमाला मान नाही. सर्वाधिक ओबीसी, दलित आदिवासी असलेले अल्पभूधारक, छोटे शेतकरी यात अधिक भरडले जातात. त्यामुळे शेतीबद्दलची अनास्था दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचे दूरगामी गंभीर परिणाम समाजाला , देशाला भोगावे ला–गतील, याबद्दल अनेक विचारवंत, कृषी अभ्यासक आणि आयोगांनी वेळोवेळी आपली भूमिका सखेद विशद केलेली आहे. पण धो–रणात्मक निर्णयाचा अभाव कायम आहे शेतकऱ्याचे बहुपदरी शोषणात भरच भर पडत आहे.

पण शेतकरी दादाला या शोषणाची जाणीव काही होत नाही. त्याला ती होऊ नये म्हणून तजवीज केलेली असते. अशी व्यवस्था कैक वर्षे टिकून आहे. ते समजण्यासाठी महात्मा फुल्यांनी मशेतकऱ्याचा असूडफ्मध्ये जे शेतकऱ्यांच्या विदारक अवस्थेस कारणीभूत परिस्थितीचे चित्र रेखाटले आहे ते समजून घ्यावे लागेल बळीराजाला. ङ्गपूर्वीच्या धूर्त आर्यब्राम्हण ग्रंथकारांनी आपले मतलबी धर्माचे लिगाड शेतकऱ्याचे मागे इतके सफाईने लावले आहे की, शेतकरी जन्मास येण्याचे पूर्वीच त्याचे आईस ज्या वेळेस ऋतु प्राप्त होतो, तेव्हा तिच्या गर्भाधानादि संस्कारापासून तो हा मरेपर्यंत कित्येक गोष्टींनी लुटला जातो, इतकेच नव्हे तर हा मेला तरी याच्या मुलास श्राद्धे वगैरेचे मिषाने धर्माचे ओझे सोसावे लागते. कारण शेतकऱ्यांचे स्त्रियांस ऋतु प्राप्त होतांच भटब्राह्मण जपानुष्ठान व तत्संबंधीं ब्राह्मणभोजनाचे निमित्त–ानें त्यांजपासून द्रव्य हरण करितात व सदरचीं, ब्राह्मणभोजनें घेतेवेळीं भटब्राह्मण आपले आप्तसोयरे व इष्टमित्रांसह तूपपोळ्यांची व दक्षिणेची इतकी धांदल उडवितात की, त्यांच्या उरल्या सुरल्या अन्नापैकीं त्या बिचाऱ्या अज्ञान शेतकऱ्यांस पोटभर आमटीपोळी मिळण्याची सुद्धां मारामार पडते. ऋतुशांतीनिमित्तानें भटब्राह्मणांची उदरशांती होऊन त्यांचे हातावर दक्षिणा पडतांच ते शेतकऱ्यास आशिर्वाद दिल्यानंतर त्यास त्यांचे स्त्रियांनीं शनिवार अथवा चतु–र्थीचीं व्रतें धरावी म्हणोन उपदेश करून घरोघर चालते होतात. पुढें भटब्राह्मण दर शनिवारी व चतुर्थीस शेतकऱ्यांचे स्त्रियांकडून रुईचे पानांच्या माळा मारुतीचे गळ्यांत घालवून व गवताच्या जुड्या गणपतीचे माथ्यावर रचून शिधेदक्षिणा आपण घेतात व पुढें कधीं कधीं संधान साधल्यास सदरची व्रतें उजविण्याची थाप देऊन शेतकऱ्यांपासून लहानमोठी ब्राह्मणभोजनें घेतात. इतक्यांत शेतकरणी बाया सृष्टीक्रमाप्रमाणें गरोदर झाल्यास, भटब्राह्मणांनी शेतकऱ्यांकडून मुंज्यांचे ब्राह्मण घालविण्याचे लटके पूर्वी केलेले नवस शेतकऱ्यांशीं सहज बोलतां बोलतां बाहेर काढावयाचे व शेतकऱ्यांच्या स्त्रिया प्रसूत होण्याच्या पूर्वी भटजीबुवा शेतकऱ्यांचे घरीं रात्रंदिवस खड्या (फेऱ्या) घालितात व त्यांच्याशीं मोठी लाडीगोडी लावून त्यांच्याशीं यजमानपणाचीं नातीं लाऊन त्यांजपासून त्या नवसांची फेड करून घेतात.

पुढें शेतकऱ्यांचे स्त्रियांस पुत्र झाले कीं, भटब्राह्मणांची धनरेषा उपटते. ती अशीं कीं, प्रथम मुख्य उपाध्ये शेतकऱ्यांचे घरीं जातात व त्यांचे घरांतील वाव व कासऱ्यांनीं वेळ मोजणाऱ्या अज्ञानी स्त्रियांस मुलांचे जन्मकाळ विचारून, ज्या ज्या राशीस जास्त अनिष्ट ग्रह जुळत असतील, तसल्या राशी मुकरर करून त्यांच्या अर्भकांच्या जन्मपत्रिका अशा रीतीनें तयार करितात कीं, अज्ञानी शेतकऱ्यांचे पुत्रजन्मानें जहालेल्या सर्व आनंदांत माती कालवून त्यास घाबरे करितात व दुसरे दिवशीं त्याजकडून पिंडींतील लिंगापुढें आपले भाऊबंद, सोयरे–धायरे व इष्टमित्रांपैकीं भटब्राह्मणास मोलानें जपानुष्ठानास बसवितात व त्यांपैकी कोणांस शेतकऱ्यापासून उपो–षणाचे निमित्तानें फलहारापुरते पैसे देववितात. उन्हाळा असल्यास पंखे देववितात, पावसाळा असल्यास छत्र्या आणि हिवाळा असल्यास पांढऱ्या धाबळ्या देववितात. खे–रीज उपाध्याचा हात चालल्यास तो शेतकऱ्यापासून पुजेच्या निमित्तानें तेल, तांदूळ, नारळ, खारका, सुपाऱ्या, तूप, साखर, फळफळावळ वगैरे पदार्थ उपटावयास कमी करीत नाहींत. शेतकऱ्यांचे मनावर मूर्तिपूजेचा जास्ती प्रेमभाव ठसावा म्हणून काहीं भट तपानुष्ठान संपेपावेतों आपल्या दाढ्याडोया वाढवितात, कांहीं फलाहारावर राहतात. अशा नानाप्रकारच्या लोणकढ्या थापा देवून जपानुष्ठान संपेपावेतों भटब्राह्मण, शेतकऱ्यांचें बरेंच द्रव्य उपटतात. शेवटीं समाप्ति करवितेवेळीं भटब्राह्मण अज्ञान शेतकऱ्यापासून ब्राह्मणभोजनासहित यथासांग दक्षिणा घेण्याविषयीं कसकशी चंगळ उडवितात हें सर्व आपणांस माहीत असेलच.ङ्ग( पृ.२६७–६८ , म.फुले समग्र वायय ) सुमारे दीडशे–पावणे दोनशे वर्षांपूर्वी केलेले हे शेतकऱ्यांच्या अवस्थेचे वर्णन आहे,

ब्राम्हणभोजने कमी झालेली असली तरी कर्मकांड व धर्मांधता टिकून आहे, आजही शेतकरी बव्हंशी याच धार्मिक मानसिक अवस्थेत आहेत. त्याला त्याच्या शोषणाची जाण व शोषकाची पहचान होऊच दिली जात नाही. यावरून शेतकऱ्यांच्या शोषणाला जातीय आणि धार्मिक आयाम असल्याचे स्पष्ट होते, बहुसंख्य शेतकरी शूद्र,अर्थात ओबीसी असल्याने, धर्म सूत्रानुसार, मनुच्या आदेशानुसार शुद्रांनी इतर वर्णाची सेवा करणे हेच वर्णधर्माचे पालन होय. धर्माचे नाव–ाखाली पुरोहितशाहीनं चालवलेले कर्मकांड, व्रत–उपवास,जप–तप अनुष्ठान महाषडयंत्रात फसवले गेलेले हे बळीराजाचे वंशज सिंधु(हिंदु)जन. त्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांचे पारंपरिक मानस कायम राहण्यासाठी शोषण यंत्रणा तत्पर असते. मध्ययुगात महादेव यादव व रामदेव यादव यांच्या काळात हेमाद्री पंडित (इ.स. १२६० ते १३०९) हे प्रधान होते. या वैदिक ब्राम्हणाने दोन हजार पेक्षा अधिक व्रतांची भलावण केलेली आढळते,आणि वर्षभर देवी दैवतांची उपासना करण्याची आवश्यकता चातुर्वर्गचिंतामणी हा ग्रंथ रचून प्रतिपादन केलेली आहे. त्यामुळे धर्माच्या नावाखाली नाडवले गेलेले स्त्रीशूद्रातिशूद्र वर्षभर ब्राम्हणीकरण झालेले सणवार, कर्मकांड, अनुष्ठानात धन्यता मानत असतात, त्यातच मोक्षप्राप्ती पुण्यप्राप्ती असल्याचा समज पसरुन ठेवला आहे. स्वधर्मीय शोषक लोणकढी थापा मारत वेळोवेळी धर्म धोक्यात आल्याची, ऐन सणासुदीच्या दिवसात बॉंबस्फोट, हल्ल्याच्या धमकीच्या अफवा पसरवून परधर्मद्वेष पसरवला जा–तो. त्याला शोषणाची जाणीव होऊ दिली जात नाही. असे मानसिक गोंधळ निर्माण करणारे कार्यक्रम वर्षभर सुनियोजितपणे आखलेले असतात.

सर्वसामान्य लोकांच्या धर्म'भोळेपणाचा फायदा घेऊन चमत्कार कर्मकांड सांगणाऱ्या कीर्तनकार मंडळीच्या आवभगतसाठीचे भागवत सप्ताह, ब्राम्हणिकरणाने बरबटलेले गणेशोत्सव, दुर्गोत्सव, हनुमान जयंती असो वा रामनवमी असो शेतकऱ्यांची मुलं यांमध्ये गुंतली जातात, अडकवली जातात. तरुण मुलं शिक्षणात मागे पडली तरी वर्गणीची पावती फाडणारी इमानेइतबारे मूर्तीची पूजा–आरती करण्यात पुढे, मिरवणुकीत आगमन– विसर्जनप्रसंगी झिंगणाऱ्या, डीजेवर थिरकणाऱ्या लेकरांना आ–पला शेतकरी बाप राबराब राबूनही आपल्या कुटुंबाच्या वाट्याला पुरेशा जीवनावश्यक सोयी मिळत नाही याचा विसर पाडण्यास ही धर्मभिषे पुरेशी ठरतात.

आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक सर्व बाजूंनी शेतकऱ्याची कोंडी होत असताना शेतकऱ्याचा कुठूनतरी आक्रोश ऐकू येतो, "शेती वाचवा, भूखंड हटवा" वाढत्या शहरीकरणामुळे शहराच्या सीमा वाढल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीला चांगला भाव मिळतोय. शेती बिनभरवशाचा व्यवसाय असल्याने शेती विकण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. त्यामुळेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात ले–आऊटचे जाळे विणले जात आहे.

शहराच्या सीमावर्ती भागातच नव्हे तर ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात ले–आऊट टाकले जात आहेत. काळी, सुपिक जमीन विक्रीला काढून त्यावर भूखंड टाकले जात आहेत. यामुळे चांगली सुपिक जमीन खराब होत आहे. असेच होत राहिले तर पुढील पिढ्यांना अन्नधान्य मिळणार नाही. त्यामुळे शेती वाचविणे गरजेचे आहे.ङ्ग दै. सकाळ मतमतांतरे सदरात शंकर चिमोटे मोहपा, जि. नागपूर अशी आर्जवी साद घा–लतात. शेतकऱ्याची प्रातिनिधिक स्वरूपात असलेली ही उद्विग्नता तितकीच गंभीरपणे घेण्याची गरज आहे.

शहराच्या अवतीभवती असण–ारी गावं त्या गावची शेतजमीन अकृषक होऊन, तेथील शेतकऱ्याचे उपजीविकेचे साधनच हातचे गेले. शेती गेली आणि शेतकरी कुटुंबात पर्यायी अर्थार्जनाचे साधन उपलब्ध करून दिल्या जात नसल्याने बाधित शेतकरी परिवार बेरोजगार झालाय. अकृषक जमीनीचे दर वाढले,काळ्या मातीच्या ले–आऊट च्या व्यवसायाला सोनेरी रंग चढला. या व्यवसायात छोट्याशा जमिनीच्या तुकड्यावर जाहिरात, दलाली, मार्केटिंगचे संस्कार होऊन शेतकऱ्याची ती काळी आई लाखो करोडोंची मप्रॉपर्टीफ होते. विकासकांना प्रचंड फायदा होत असेल, पण कृषक शेतजमिनीचे क्षेत्र हळूहळू कमी होत जाते.

शहरालगतच्या गावांतून शहरवासीयांना पुरवठा होणारा भाजीपाला फळे, धान्य दूरवरच्या ग्रामीण भागातून आणल्याशिवाय पर्याय नाही. शेतकरी आत्महत्या म्हणजे मरोज मरे त्याला कोण रडेफ अशी गत झाली आहे. एकिकडे शेती करणे आतबट्ट्याचा व्यवहार झाला, त्या अनास्थेतून शेतीबद्दलची नावड, कृषक क्षेत्राची घट, अन्नधान्याच्या पूर्ततेचे प्रश्न तयार होईल. तर दुसरीकडे शहरीकरणामुळे शेती आणि शेतकरी यांवरील विकासकांचे आक्रमण, यातून शेतकऱ्याच्या अस्तित्वाबद्दल चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे.

शेतकरी नेमका कुठे आहे याचा शोध आणि बोध शेतकरी घेतील का? तो घ्यावा लागेल. शेतकऱ्यांच्या नव्या पिढ्या आता बऱ्यापैकी शिक्षणात सरसावल्या आहेत, त्यांना या देशातील जातउतरंडीवर आधारित शोषण समजून घेण्यासाठी बळीराजा, चार्वाक, महावीर, तथागत गौतम बुद्ध, कबीर, बसवेश्वर, चक्रधर, नामदेव, तुकाराम, गाडगेबाबा,महात्मा फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर, पंजाबराव देशमुख, यांचा वैदिक व्यवस्थेविरुद्ध लढा आकळून शेतकरी जागा झाल्याशिवाय शेतकऱ्यांचे शोषण थांबणार नाही. त्यासाठी लोकायत, जैन, बौद्ध, लिंगायत, महानुभाव, वारकरी,वगैरे अवैदिक परंपरा, सत्यशोधक समाज, कृषक समाज यांनी केलेली समाजक्रांतिकारक जागृती आजही तितकिच निकराची वाटते.

**अनुज हुलके**

## गोंदियात प्रेस क्लब गोंदियाची स्थापना
### अध्यक्ष हिदायत शेख ,कार्याध्यक्ष सावन डोये तर सचिव पदी प्रमोद नागनाथे यांची निवड




**गोंदिया:–** पत्रकारांच्या विविध समस्या, प्रश्नांना सोडवता यावे यासाठी गोंदियातील प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयातील पत्रकार बांधवांनी एकत्र येत, गुरुवार ४ सप्टेंबर रोजी प्रेस क्लब गोंदियाची स्थापना केली.

स्थानिक दैनिक देशोन्नती जिल्हा कार्यालय येथे वरीष्ठ पत्रकार संतोष शर्मा यांच्या अध्यक्षतेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हिदायत शेख, खेमेंद्र कटरे, सावन डोये, प्रमोद नागनाथे, मुनेश्वर कुकडे, देवेंद्र रहांगडाले, भरत घासले, रविंद्र तुरकर, दुर्गेश येल्ले, दिलीप चव्हाण, डिलेश्वर पंधराम आदी उपस्थित होते. प्रसंगी प्रेस क्लबची कार्यकारीणी गठीत करण्यात आली.

ज्यामध्ये क्लबच्या अध्यक्षतेपदी हिदायत शेख यांची तर सचिव पदावर प्रमोद नागनाथे, कार्याध्यक्ष सावन डोये, कोषाध्यक्ष संतोष शर्मा, समन्वयक पदी भरत घासले व शाहिद पठाण तर मार्गदर्शक म्हणून खेमेंद्र कटरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्याचबरोबर सदस्यांमध्ये मुनेश्वर कुकडे, देवेंद्र रहांगडाले, रविंद्र तुरकर, अनिल मदनकर,दुर्गेश येल्ले, राकेश रामटेके यांचा समावेश करण्यात आला.

## जिल्हा नियोजन समितीची सभा १२ सप्टेंबरला

**गोंदिया :–** राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची सभा शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन सभागृह, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे आयोजित केलेली आहे. सभेची विषय सुची खालील प्रमाणे आहे.



जिल्हा नियोजन समिती सभा २५ जानेवारी २०२५ चे इतिवृत्त कायम करणे व इतिवृत्तातील मुद्यांच्या अनुपालनास मंजुरी देणे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२४–२५ अंतर्गत माहे मार्च २०२५ अखेर झालेल्या खर्चास मान्यता प्रदान करणे (सर्वसाधारण योजना/ अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/ओटीएसपी योजना). जिल्हा वार्षिक योजना सन २०२५–२६ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा माहे ऑगस्ट २०२५ पर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा घेणे (सर्वसाधारण योजना/अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/ओटीएसपी योजना). जिल्हा वार्षिक योजना सन २०२५–२६ च्या अनुषंगाने कामांना मान्यता प्रदान करणे. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय. या सभेस सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी अद्ययावत माहितीसह नियोजित वेळेपूर्वी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव प्रजित नायर यांनी केले आहे.

## महा.अंनिसचा २०२५ चा राज्यस्तरीय आधारस्तंभ पुरस्कार अनिल गोंडाने यांना जाहीर

**गोंदिया:–** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राचे राज्यस्तरीय आधारस्तंभ पुरस्कार अनिल गोंडाने गोंदिया जिल्हा कार्याध्यक्ष यांना जाहीर करण्यात आले आहेत अशी माहिती महा.अनिसच्या मुक्ता दाभोलकर,राहुल धोरात,रामभाऊ डोंगरे यांनी दिली. यामध्ये अंनिसचे नागपूर जिल्हा पदाधिकारी पुष्पा घोडके, शाखा पदाधिकारी मंगला गाणार,वर्षा सहारे,विजयाताई ठाकरे आणि ग्रंथमित्र पुरस्कार चंद्रशेखर मेश्राम, विजयकांत पाणबुडे शतकवीर पुरस्कार चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तहसील शाखेचे अध्यक्ष दिलीप गेडाम तसेच भद्रावती तहसील शाखा कार्याध्यक्ष शारदा ताई खोब्रागडे, यांचा सुद्धा समावेश आहे. अंनिसचे हे कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा विचार घेऊन समाजामध्ये अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य चिकाटीने करत आहेत. त्यांच्या क्रियाशीलतेमुळे नागपूर, चंद्रपूर, गोंदिया,वर्धा,गडचिरोली,यवतमाळ, भंडारा जिल्ह्यामध्ये संघटनेचे काम वाढत आहे. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकाच्या वाढीसाठी हे कार्यकर्ते सतत प्रयत्नशील असतात.



या पुरस्काराचे वितरण लातूर येथे रविवार दि. १४ सप्टेंबर रोजी पन्नालाल भाऊ सुराणा (ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ता) यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी गणेश चिंचोले,मुक्ता दाभोलकर, राजीव देशपांडे, राहुल थोरात उपस्थित असणार आ–हेत. पुरस्कार प्राप्त कार्यकत्यांचे अभिनंदन रामभाऊ डोंगरे राज्य कार्यकारी समिती सदस्य,नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे,विनोद बनसोड,अतुल सतदेवे,अमित उके, के. पी.उके,मनोज बनसोड,पल्लवी रामटेके गोंदिया जिल्ह्य पदाधिकारीकार्यकर्ते यांनी केले आहे.

## वळणे समितीचा अहवाल सादर करा;अन्यथा रस्त्यावर उतरणार
### गोंड गोवारी जमात संघर्ष कृती समितीचा निर्णय

**अर्जुनी–मोरगाव :–** तत्कालीन महायुती सरकारने के. एल. वळणे समिती गठित करून सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याची ग्वाही दिली होती. पण त्याची पूर्ततः अद्यापही न केल्याने या विरोधात रस्त्यावर उतरण्याचा इशारा गोंड गोवारी जमात संविधानिक हक्क संघर्ष समिती रस्त्यावर उतरण्याचा इश–ारा दिला आहे.

गोंड गोवारी जमात संविधान संघर्ष कृती समितीने त्यांच्या मागण्यांसाठी मोर्चा, आंदोलन, उपोषण आणि रिझर्व्ह बँक चौक नागपूर येथे भव्य रास्ता रोको आंदोलन केले होते. त्याचीच दखल घेत शासनाने के. एल. वळणे समिती गठित करून सहा महिन्यांत अहवाल सादर करून निर्णय शासन काढण्याचे दिले होते. आश्वासन परंतु शासनान मूळ मागणीला फाटा देत के. एल. वळणे समितीचा अहवाल प्रलंबित असताना मूळ मागणीला बाजूला करून शासनाने जाणीवपूर्वक गोंड गोवारी जमातीची दिशाभूल केली.




या ज्वलंत प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी लोकशाही मार्गाने येणाऱ्या विधानसभा अधिवेशन काळात संघर्ष कृती समितीकडून रस्त्यावर उतरण्याचा इशारा संघटनेचे पदाधिकारी डॉ. पी. एम. राऊत यांनी दिला आहे.

## मंत्रिमंडळ बैठकीत फडणवीस सरकारचे ४ मोठे निर्णय; मीरा–भाईदर ते अकोला, रायगड ते संभाजीनगर, तर शेतकऱ्यांना...!

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत शेतकरी, नागरिक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी निगडित असे चार महत्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यापैकी सर्वात मोठा निर्णय म्हणजे उपसा जलसिंचन योजनांसाठी वीज दरातील सवलतीला मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देणे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यासोबतच मीरा–भाईंदर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी तब्बल ११६ कोटी रुपये कर्ज उभारणीस मंजुरी देण्यात आली. त्यामुळे या भागातील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होणार आहे. या व्यतिरिक्त इतर दोन निर्णयही कृषी आणि नागरी विकासाशी निगडित असून, राज्य सरकारच्या या पावलामुळे जनतेच्या जीवनमानात सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# जिल्ह्यात सरासरी २२०.१ मिमी पावसाची तूट



**गोंदिया :-** सप्टेंबर महिना लागला असला तरी पावसाळा अद्याप संपला नसतानाही पावसाने दडी मारली आहे. ढग दाटून येत असतानाच पाऊस मात्र हुलकावणी देत असल्यामुळे शेतकऱ्यांसोबतच सर्वसामान्यांचेही टेन्शन वाढले आहे. जिल्ह्यात सरासरी १२२०.३ मिमी पाऊस अपेक्षित असतानाच ८ सप्टेंबरपर्यंत सरासरी १०००.२ मिमी पाऊस बरसला आहे. अशात आता जेमतेम २१ दिवसांचा कालावधी उरला असून यामध्ये सरासरी २२०.१ मिमी पावसाची गरज आहे. मात्र, पावसाची चिन्हे दिसून येत नसल्याने काय होणार याचीच चिंता सर्वांना लागून आहे.

जिल्ह्यात जुलै महिन्यातील पावसाने सावरले असून ऑगस्ट महिन्यातही पावसाने साथ दिल्याने आजघडीला आहे तेवढा पाणीसाठा जिल्ह्यात होऊ शकला आहे. मात्र, सप्टेंबर महिना लागताच पावसाने दडी मारली आहे. दररोज ढग दाटून येतात व आता पाऊस बरसणार अशी आशा पल्लवित होते. मात्र, फक्त ढग दाटून येतात व निघून जातात, अशी स्थिती आहे. परिणामी पावसाची तूट दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. ८ सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यात सरासरी १०७४.६ मिमी पाऊस अपेक्षित आहे. मात्र, सरासरी १०००.२ मिमी पाऊस बरसला आहे. म्हणजेच, येथे सरासरी ७४.४ मिमी पावसाची तूट पडली आहे.

तर ३० सप्टेंबरपर्यंत पावसाळ्याचा कालावधी गणला जात असून तोपर्यंत जिल्ह्यात सरासरी १२२०.३ मिमी पाऊस अपेक्षित आहे. शिवाय, एवढा पाऊस पडणे जिल्ह्याला गरजेचे आहे कारण, एवढ्या पावसानंतरच जिल्ह्याची वर्षभराच्या पाण्याची सोय होते असे म्हणता येईल. मात्र, यंदा जेम तेम सरासरी १०००.२ मिमीवरच गाडी अडकून पडल्याने उरलेल्या २१ दिवसांत जिल्ह्यात सरासरी २२०.१ मिमी पाऊस अपेक्षित आहे. अन्यथा मोठी समस्या निर्माण होणार, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.देवरी तालुक्यात ८ सप्टेंबरपर्यंत ११३४.९ मिमी पाऊस अपेक्षित असून तेथे ११४८.५ मिमी पाऊस बरसला आहे. तर अर्जुनी-मोरगाव तालुक्यात ११६७.२ मिमी पाऊस अपेक्षित असतानाच तेथे १२०१.१ मिमी पाऊस बरसला आहे यंदा सुरुवातीपासूनच पावसाची किरकिर सुरू होती व ती आतापर्यंत सुरूच आहे. हेच कारण आहे की, अपेक्षित सरासरी अद्याप गाठलेली नाही.

तर मागील वर्षी ८ सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यात सरासरी १०७७.७ मिमी पाऊस बरसला होता. म्हणजेच, १००.३ टक्के पाऊस बरसला होता. यंदा मात्र सरासरी १०००.२ मिमी एवढाच बरसला असून त्याची ९३.१ एवढी सरासरी आहे.

## महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जोपासण्यासाठी महागणेशोत्सव स्तुत्य उपक्रम-जिल्हाधिकारी प्रजित नायर



**गोंदिया :-** लोककला ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. या माध्यमातून स्थानिक कलावंतांना आपल्या कला-गुणांना वाव देण्यासाठी एक व्यासपीठ मिळत असते. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जोपासण्यासाठी महागणेशोत्सव हा एक स्तुत्य उपक्रम आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने जलाराम लॉन, आमगाव रोड, गोंदिया येथे (ता.६) आयोजित महाराष्ट्र राज्य उत्सव महागणेशोत्सव कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. पोलीस अधीक्षक गोरख भामरे, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) मानसी पाटील, तहसिलदार समशेर पठाण, अपर तहसिलदार श्रीकांत कांबळे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. नायर पुढे म्हणाले, महाराष्ट्र हे एक प्रगत राज्य आहे. राज्यात आपली संस्कृती आहे. महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात राज्याच्या विविध भागांमध्ये साजरा करण्यात येतो. भक्ती व अध्यात्माला सामाजिक बाबीची जोड देणारा हा महोत्सव शासनामार्फत राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. गणेशोत्सव ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. आपल्या संस्कृतीचे जतन व्हावे, जोपासना व्हावी, संस्कृती वृध्दींगत व्हावी यासाठी गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. या माध्यमातून स्थानिक कलावंतांना त्यांच्यात असलेल्या कला-गुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ मिळण्यात मदत होते, असे त्यांनी सांगितले.

श्री. भामरे म्हणाले, गणेशोत्सव साजरा करणे हा महाराष्ट्राचा एक सांस्कृतिक वारसा आहे. लोकांच्या धार्मिक भावनेला अनुसरुनच महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास देखील लोकांपर्यंत पोहचविण्याचे शासनाचे धोरण आहे. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा या गणेशोत्सवातून अधोरेखित करण्याकरीता आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी या माध्यमातून कलावंतांना व्यासपीठ मिळण्याची संधी उपलब्ध होत असते. या निमित्ताने समाजातील प्रत्येक व्यक्ती गणेशोत्सवात सहभागी होत असतात. गणेश उत्सव दरम्यान नागरिकांनी कायदा व सुव्यस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे व महागणेशोत्सव पर्व शांतता व आनंदाने साजरा करावे असे त्यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी सत्य साई सेवा मंडळ गोंदिया द्वारे वीण विनाशक गणनाथा... गजाननारे गननाथा, जगदेश्वरी दया करो माँ... शिवशंकरी कृपा करो माँ, मजोरे मेबुवा साई राजगोपाला, जय गणराया... श्री गणराया मंगलमुर्ती मोरया आदी भजन सादर करण्यात आले.

गुरुदेव सेवा मंडळ गोंदिया द्वारे आओ गजानंद आओ... आके भक्तो का मान बढाओ, आओ गजानंद प्यारे... गिरजा के दुल्हारे, मुक मे हरि है... मन मे हरी है, डमडम बाजे रे बरवा आदी भजन सादर करण्यात आले.

त्यानंतर नरखेडा नृत्य समुह कलावंतांद्वारे गणेश वंदना सादर करण्यात आली. नंतर स्वच्छतेकडून समृध्दीकडे यावर गणेश स्मरण सादर करण्यात आले. असर फाऊंडेशनच्या कलावंतांद्वारे वासुदेव आला यावर लोक संगीत सादर करण्यात आले. लावण्य कटरे या मुलीने राधा गोरी-गोरी... बरसाने छोरी या गाण्यावर नृत्य सादर केले. अदासी येथील मुलींनी गोंडीनृत्य सादर केले. नरखेडा नृत्य समुह कलावंतांद्वारे गवळण सादर करण्यात आली. धनश्री पारधी या मुलीने एकल नृत्य सादर केले. अंबाबाईचा उधव-उधव हे गोंधळ सादर करण्यात आले. असर फाऊंडेशनच्या कलावंतांद्वारे जय महाराष्ट्र माझा, आई जगदंबेचा जोगवा, विठ्ठलाच्या वारीला चला सादर करण्यात आले. डॉ.अजयकुमार शर्मा यांनी जानता राजा शिवाजी महाराज यांच्यावर गीत सादर केले. पुनम पाटील यांनी वाट पाहते मी गं, येणार साजन माझा ही लावणी सादर केली. त्यानंतर मुलींनी गोंडीनृत्य सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी महाराष्ट्राचा राज्य उत्सव महागणेशोत्सव साजरा करण्याबाबत सविस्तर माहिती विशद केली. याप्रसंगी मान्यवरांचा स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, जि.प.चे माहिती व शिक्षण तज्ञ अतुल गजभिये, नैसर्गिक आपत्ती कार्यालयाचे संजय लाडे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमास नायब तहसिलदार प्रकाश तिवारी, सहाय्यक अधीक्षक देवेंद्र पोरचेट्टीवार, सहाय्यक माहिती अधिकारी कैलाश गजभिये, समाजसेविका रोहिणी रहांगडाले यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंजुश्री देशपांडे यांनी केले, तर उपस्थिताचे आभार तहसिलदार समशेर पठाण यांनी मानले.

## अपघातात मृत पावलेल्या कुटुंबियाचे आमदार बडोले यांनी केले सांत्वन



**अर्जुनी-मोरगाव:-** तालुक्यातील नवेगावबांधजवळ कोहमारा-अर्जुनी - मोरगाव राज्य महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात नवेगाव बांध येथील तारेश मनोहर सांगोळकर (वय २५ वर्षे) यांचे अपघाती निधन झाले. पाठीमागून आलेल्या ॲम्बुलन्सच्या जोरदार धडकेमुळे झालेल्या या अपघातात तारेशचा जागीच मृत्यू झाला असून ही अत्यंत वेदनादायक घटना आहे.

गावातील कर्तृत्ववान, अभ्यासू आणि समाजाभिमुख असलेला हा तरुण दुर्दैवी अपघातात आपल्यातून निघून गेल्याने संपूर्ण गाव शोकाकुल झाले आहे.( ता.६) आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी सांगोळकर कुटुंबीयांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेत दुःखात सहभागी होवुन त्यांना धीर दिला.

विधानसभा क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मौजा भदुटोला या गावात जाऊन वाघाच्या हल्ल्यात जखमी झालेल्या रामदास मन्साराम कापगते यांची या विभागाचे लोकप्रिय आमदार राजकुमार बडोले यांनी भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

यावेळी धीर देत शासनाकडून नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.वन प्राण्यांचे वाढते हल्ले हे गावकऱ्यांसाठी मोठा धोका निर्माण करत आहेत. त्यामुळे उपवनरक्षक यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून आवश्यक ती उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.या भेटीदरम्यान पंचायत समितीचे सभापती चेतन वळगाये, जिल्हा महामंत्री प्रशांत शहारे, सुभाष कापगते, आत्माराम कापगते तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

## उचेपूर ग्रामपंचायतच्या ग्राम सेवकाचा मनमर्जी कारभार

**देवरी:** -तालुक्यातील उचेपूर येथील ग्रामपंचायतचे ग्रामसेवक हे मनमर्जीने कारभार करीत असून, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता कामे करीत आहे. त्यामुळे त्यांची चौकशी करून त्यांच्यावर त्वरित कारवाई करण्याची मागणी ग्रामपंचायत पदाधिकारी आणि गावकऱ्यांनी पंचायत समिती सभापती अनिल बिसेन यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनातून ग्रामसेवक मागील चार वर्षांपासून ठेकेदारी करीत असल्याचा आरोप केला आहे.

ठक्कर बाप्पा योजनेचे काम स्वतः करून २० लक्ष रुपयांची उचल केली आहे. या संदर्भातील ठराव आणि माहिती सरपंचाने ग्रामसेवकाकडे मागितली असता, ती देण्यास ग्रामसेवक टाळाटाळ करीत असल्याचा आरोप केला आहे. ग्रामसेवक ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता कामे करीत असून, ग्रामपंचायतला नियमित उपस्थित राहत नाही. त्यामुळे या सर्व प्रकारांची सखोल चौकशी करून, या ग्रामसेवकावर कारवाई करून येथून त्वरित हटविण्यात यावे, अशी मागणी सरपंच सेवंताबाई गहाणे, सदस्य पदम घाटघुमर, विमला कुंभरे, सरिता धुर्वे, गौतम सोनकुकरा यांनी केली आहे

## नेत्रदान पंधरवडा निमित्त नेत्रदानाबाबत जनजागृती




**गोंदिया :-** २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत संपूर्ण देशभरात साजरा होर्णा ?या नेत्रदान पंधरवड्यानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय आणि महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटच्या संयुक्त विद्यमाने एक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या विशेष उपक्रमात पथनाट्य, पोस्टर प्रदर्शन आणि नेत्रदान मार्गदर्शन सत्र घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले यांनी नेत्रदानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, ङ्गनेत्रदान हे दान नसून, एक जीवनप्रदायी कृती आहे. एका मृत व्यक्तीच्या नेत्रांमुळे दोन अंध व्यक्तींना पुन्हा प्रकाश पाहता येतो.ङ्ग त्यांनी नेत्र प्रत्यारोपणाची प्रक्रिया, फायदे आणि याबाबतच्या गैरसमजांबाबतही माहिती दिली. जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. चंद्रकिशोर पारधी, डॉ. खडके, सक्षम एनजीओचे प्रभाकर राव, सुषमा यादव, तसेच नेत्रदान समुपदेशक भाविका बघेल (जिल्हा सामान्य रुग्णालय) यांनी उपस्थितांना नेत्रदान प्रक्रियेबाबत सखोल माहिती दिली. ङ्गकोण नेत्रदान करू शकतो, कोण नाही करू शकत आणि मृत्यूनंतर किती वेळात नेत्रदान करता येतेङ्ग यासारख्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी सोप्या भाषेत दिली. कार्यक्रमाची खास आकर्षण ठरली ती विद्यार्थ्यांनी सादर केलेली पथनाटिका, ज्यामध्ये त्यांनी नेत्रदानाचे महत्त्व अत्यंत प्रभावी रीतीने सादर केले. ङ्गनेत्रदान - प्रकाशाची भेटङ्ग या संदेशाने सुसज्ज असलेली पथनाटिका प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवून गेली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी तयार केलेले पोस्टर आणि चित्रांचे प्रदर्शन हेही नागरिकांचे लक्ष वेधून गेले. या उपक्रमाचे आयोजन एनएसएस कार्यक्रम अधिकारी कल्पना घोषाल आणि राजकुमार पटले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## अंगणवाडी सेविका-मदतनिसना पेन्शन व ग्रॅच्युइटी लागू करा



**गोंदिया :-** अंगणवाडी सेविका मदतनिसना पेन्शन व ग्रॅच्युइटी लागू करा यासह अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी बाल कर्मचारी युनियनच्यावतीने (आयटक) सोमवारी (दि.८) खासदार डॉ. नामदेव किरसान याच्या आमगाव निवासस्थानी त्यांचे प्रतिनिधी दुष्यंत किरसान यांना निवेदन देण्यात आले.

अंगणवाडी सेविका-मदतनिसना पेन्शन व ग्रॅच्युइटी लागू करा, टीएचआर बंद करून ताजे गरम आहार द्या, उन्हाळ्यात एक महिन्याची सुटी लागू करा आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. यावर दुष्यंत किरसान यांनी केंद्र सरकारपुढे मागण्या ठेवण्यात येतील, असे आश्वासन दिले.

निवेदन देताना राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले, परेश दुरुगवार, ज्योती लिल्हारे, पुष्पा भगत, अनिता शिवनकर, पंचशीला शहारे, लता बरेकर, मीनाक्षी राऊत, सुनीता मेश्राम, जयकुवर मच्छिरके, शुद्धलेखा बडोले, अरुणा खोब्रागडे यांच्यासह अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या.

## ३२ वर्षात सर्पमित्र मनिष नाईकांनी पकडले ८ हजार साप



**गोंदिया:-**जवळील फुलचूर ग्रामपंचायत परिसरात असलेल्या बम्लेश्वरी कॉलनी परिसरात अचानक साप दिसल्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असतानाच कॉलनीतील रक्तमित्र विनोद (गुड्डू) चांदवानी यांनी सर्पमित्र असलेल्या मनिष नाईक यांना माहिती देत बोलावून घेतले.नाईक यांनीही वेळ न गमावता घटनास्थळी पोचून सापाला पकडून जंगलात सोडून दिले.या घटनेनंतर कॉलनीवासीयांनी सर्पमित्र मनीष नाईक व रक्तमित्र विनोद (गुड्डू) चांदवानी यांचे मनःपूर्वक आभार मानले व त्यांच्या सामाजिक योगदानाचे कौतुक केले.सर्पमित्र मनीष नाईक मागील ३२ वर्षांपासून सतत सर्पसंवर्धनाचे कार्य करत आहेत.

अवघ्या १८ व्या वर्षापासून त्यांनी हे कार्य सुरू केले. लहानपणी मासे पकडताना योगायोगाने त्यांच्या हातात साप आल्याने त्यांना धैर्य मिळाले आणि तेव्हापासूनच त्यांनी या कार्याला आपले जीवनध्येय बनवले.आजपर्यंत मनीष नाईक यांनी ८००० पेक्षा अधिक सापांना सुरक्षित पकडून पांगडी जंगलात सोडले आहे. त्यांचे हे कार्य केवळ नागरिकांना भयमुक्त करत नाही तर पर्यावरण संरक्षण आणि वन्यजीव संतुलनासाठीही अत्यंत मोलाचे ठरत आहे.गोंदिया शहर व परिसरात जेव्हा-जेव्हा सापांच्या उपस्थितीमुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली, तेव्हा-तेव्हा मनीष नाईक यांनी तत्परतेने सेवा दिली आहे. त्यांचे हे समर्पण आज समाजासाठी प्रेरणादायी आहे.

## संघ भाजपचे जुने कार्यकर्ते शुक्राचार्य ठाकरेंचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**तिरोडा:** - तालुक्यातील भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे जुने कार्यकर्ते शुक्राचार्य ठाकरे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष नाना पटोले व गोंदिया जिल्हा काँग्रेस अध्यक्ष दिलीप बनसोड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

गेल्या ४० वर्षापासुन ठाकरे हे संघाचे प्रचारक म्हणून काम करीत होते.त्यांच्यासोबत पांजराचे माजी सरपंच रवी चामट यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात सुकडी येथील निवासस्थानी प्रवेश केला.त्यावेळी उपस्थित पवन मोरे शहराध्यक्ष तिरोडा,सौरभ चव्हाण युवाध्यक्ष,संजय खियानी,प्रविण चव्हाण,वंदना काळे महिलाध्यक्ष,राजु काळे,रेवाशंकर पटले अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



## ओबीसी समाजाच्यावतीने ओबीसी आरक्षणात घुसखोरी विरोधात निवेदन



**आमगावः-**सकल ओबीसी समाज आमगावच्या मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्याच्या संभाव्य निर्णयाला तीव्र विरोध दर्शवण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री यांच्या नावे असलेले निवेदन तहसिलदार यांच्या मार्फेत पाठविण्यात आले.

निवेदनात मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देवू नये अन्यथा येणाऱ्या काळात विराट मोर्चा काढुन रस्ते जाम करू असे संकेत महाराष्ट्र शासनाला सर्व ओबीसी समाजांने निवेदनातून दिले आहे.निवेदन देतेवेळी प्रामुख्याने डॉ. गुरूदास येडेवार, प्रभाकर दोनोडे, सावन कटरे,तिरथ येटरे, संजय बहेकार, भुमेश शेंडे, बालू वंजारी, हिमालय येळे,धिरज ठाकरे, चंद्रकुमार बहेकार, बालू भाऊ गायधने,ओमप्रकाश लांजेवार, विशाल रहांगडाले, महेश उके, जगदिश चूटे,देवकांत बहेकार आदी शेकडो ओबीसी बांधव उपस्थित होते.

## आजी माजी सैनिकांचा सत्कार ही गौरवाची बाब-भेंडारकर




**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील बोंडगावदेवी जि. प. क्षेत्र आपली मातृभुमी व कर्मभुमी आहे. त्यातच बोंडगावदेवी हे गाव अत्यंत धार्मिक व सामाजिक गांव आहे. गंगा-जमुना माताचे पवित्र स्थान असल्याने या गावची महती सर्वदूर पसरली आहे. अशा या पावन गावात दहा दिवस सार्वजनीक बाल गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात विविध उपक्रमासह राबविल्या जातो. गणेश मंडळाने आयोजीत केलेला आजी, माजी सैनिकांचा जाहीर सत्कार ही गौरवाची बाब असुन देशाभिमान जागृत झाल्याची भावना निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन बोंडगावदेवी क्षेत्राचे जि.प. सदस्य तथा गोंदिया जि.प. चे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.

सार्वजनिक बालगणेशोत्सव मंडळ बोंडगावदेवीच्या वतीने भारतीय सैनिक तसेच वीरांगणांचा सत्कार समारंभ व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने ३ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना भेडारकर बोलत होते.

यावेळी भारतीय सैनिक व माजी सैनिक डाकराम पुस्तोळे (तलाठी), पवन ठाकरे, जितेंद्र शेंडे, राजाराम नेवारे, चरणदास चवरे (सिआरपीएफ), त्रीवेणी शहारे, कापगते, झलके यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला सरपंच प्रतिमा बोरकर, देवलाल मानकर, धम्मपाल वालदे शा.व्य.स. अध्यक्ष, अनिल मानकर, मंगलाताई राम टेक्ले पोलीस पाटील, माजी सरपंच राधेश्याम झोळे, अमरचंद ठवरे, कुसन झोळे, पतिराम मेश्राम, माया मेश्राम, शिवकुमार मेश्राम, वेतनाताई रामटेके, ललिता बोरकर, संजय गिरीपुंजे, दीपक नेवारे, मनोज लांजेवार, शांतीप्रकाश भैसारे, डाकराम पुस्तोडे, पवन ठाकरे, जितेंद्र शेंडे, राजाराम नेवारे, चरणदास चवरे, त्रिवेणी शहारे, मुख्याध्यापक कापगते यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष मंडळी उपस्थित होते.

## कामाचे तास वाढवण्याचा निर्णय रद्द करा



**गोंदिया :-** महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाने दुकाने व आस्थापना त्याचबरोबर कारखान्यातील कामगारांचे कामाचे तास वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार दुकानांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास प्रतिदिन ९ तास तर कारखान्यात काम करणाऱ्या कामगारास प्रती दिन १२ तास काम करावे लागणार आहे. हा निर्णय कामगारांच्या हक्कावर गदा आणणारा आहे. यामुळे कामाचे तास वाढविणारा निर्णय रद्द करण्यात यावा, अशी आयटकचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले यांनी केली आहे.

कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ मध्ये कारखान्यातील दैनंदिन कामाच्या तासाचे मर्यादा ९तास होती ती आता १२ तासापर्यंत नव्या निर्णयानुसार करण्यात आली आहे. कारखान्यातील विश्रांतीसाठी सुट्टीचा कालावधी ५ तासानंतर ३० मिनिटे होता, तो आता ६ तासानंतर ३० मिनिटे केला आहे. आठवड्याच्या कामाचा कार्याचा विस्तार कालावधी साडेदहा तासावरून १२ तास करण्यात आला आहे. अतिकालिक (ओव्हरटाईम) कामाच्या तासाची मर्यादा ११५ तास प्रति तिमाही होती, ती आता १४४ तास प्रति तिमाही अशी केली आहे. मंत्रिमंडळाचा वरील निर्णय राज्यातील कामगार संघटनांची कुठलीही चर्चा न करता केंद्र सरकारच्या दबावाखाली निर्णय केला आहे. राज्यातील मालक वर्गाचे नफे वाढवावेत, यासाठीच हा निर्णय करण्यात आला आहे. त्याचबरोबर हा निर्णय करताना कामगारांच्या हिताला तिलांजली देण्यात आली आहे. त्यामुळे सरकारने निर्णयाचा पुर्नविचार करून कामगारांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी शासन निर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी आयटकचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले यांनी केली आहे.

## ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देण्यास विरोध, मुख्यमंत्र्यांना निवेदन




**अर्जुनी मोरगावः-** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्याच्या संभाव्य निर्णयाला तीव्र विरोध दर्शवण्यासाठी अर्जुनी मोरगाव तालुका सकल ओबीसी समाज व ओबीसी संघटनाच्यावतीने मुख्यमंत्री यांना उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला गोबीसीतुन आरक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने २ सप्टेंबर रोजी काढलेला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र.: -सीबीसी-२०२५/प्र.क्र.१२९/ मावक,दि.०२ सप्टेंबर २०२५ अन्वये हैद्राबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्याबाबत काढलेला निर्णय हा ओबीसी समाजावर अन्याय करणार आहे. तसेच पुन्हा सरकारने सगेसोयरेंच्या माध्यमातुन ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचे काम झालेले आहे.तो शासन निर्णय त्वरीत रद्द करण्यात यावे याकरीता निवेदनातुन करण्यात आली आहे.

निवेदनात शासनाने तात्काळ जातीनिहाय जनगणना करावी,जेणेकरुन प्रत्येक समाजाची लोकसंख्या आणि त्यांची सामाजिक,आर्थिक स्थिती स्पष्ट होईल.५०% आरक्षणाची मर्यादा हटवुन लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वांना आरक्षण द्यावे.शासनाने मराठा आंदोलकांच्या दबावाखाली कोणताही निर्णय घेऊ नये आणि ओबीसी समाजाच्या आरक्षणाचे रक्षण करावे.निवेदनातील आमच्या मागण्यांचा विचार न झाल्यास, भविष्यात रस्त्यावर उतरुन विराट मोर्चा आणि आमरण उपोषण करण्याचा इशारा ललितकुमार बाळबुद्धे, शंकर लोगडे, दुलीचंद लांजेवार, श्रीकांत डोंगरवार, रमेश लाडे, दर्शनाबाई लाडे व श्रावणभाऊ मेंढे आदिंनी निवेदनातून दिला आहे.

# ओबीसींचा सरकारला "इशारा",शासन निर्णयाची केली होळी

## गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन; मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याला विरोध



**गोंदिया :–** ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संभाव्य निर्णयाचा तीव्र विरोध करीत जिल्ह्यातील ओबीसी संघटनांनी बुधवारी (ता. ३) सकाळी ११ ते दुपारी तीन वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ङ्गसरकारला इशाराफ आंदोलन केले. यावेळी शेकडोंच्या संख्येने एकवटलेल्या समाजबांधवांनी शासनाच्या २ सप्टेंबरच्या परिपत्रकाचीही होळी केली.

महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २ सप्टेंबर रोजी काढलेला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय रद्द करावा, हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा–कुणबी किंवा कुणबी–मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबत काढलेला हा निर्णय ओबीसी समाजावर अन्याय करणार आहे. पुन्हा सरकारने सगेसोयरेंच्या माध्यमातून ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचे काम केले आहे. असा आरोप करीत ओबीसी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी केली.

सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत कोणताही निर्णय घेतल्यास त्याचा थेट परिणाम ओबीसी समाजावर होणार आहे. त्यामुळे आम्ही कोणत्याही परिस्थितीत मराठा समाजाला असंविधानिक पद्धतीने ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्याच्या विरोधात आहोत, याची सरकारने काळजी घेत सदर निर्णय मागे घ्यावा, असा मागणीवजा इशारा सकल ओबीसी समाज व ओबीसी संघटनांनी या आंदोलनातून दिला आहे. त्यानंतर आंदोलकांनी शासनाने काढलेल्या २ सप्टेंबरच्या परिपत्रकाची होळी केली.

आंदोलनात ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे, अशोक लंजे, कैलास भेलावे, जिल्हा बँकेचे संचालक गंगाधर परशुरामकर,दुर्गाप्रसाद ठाकरे,ओबीसी संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष अमर वराडे,जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे, जि.प.माजी सभापती संजय टेंभरे, टिकाराम भेंडारकर, गोवर्धन बोपचे,ओबीसी सेवा संघ आमगावचे भूमेश शेंडे, मनोज हरीणखेडे,पवार प्रगतीशिल मंचचे माजी अध्यक्ष एड.पृथ्वीराज चव्हाण, प्रमोद गुडधे, नरेश परिहार,पंचायत समिती सदस्य अजाबराव रिनायत, ओबीसी सेवा संघ गोंदिया व वेगळ्या विदर्भ समितीचे सी.पी. बिसेन,ओबीसी संघर्ष समिती सडक अर्जुनीचे अध्यक्ष दिनेश हुकरे,माजी सरपंच माधवराव तरोणे, राजकुमार लाडसे, देवानंद कुकडे, राजुभाऊ ब्राम्हणकर, तुळिशदास शिवणकर, महेंद्र बिसेन, रमेश मेंढे, गिरीधारी हत्तीमारे, लोकचंद कापगते, मोहन भेंडारकर, सर्ववर्गीय कलार समाज संघटनेचे धर्मेंद्र डोहरे,राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी आघाडीचे प्रदेश सचिव व ओबीसी अधिकार मंच सालेकसा सयोंजक प्रभाकर दोनोडे,ओबीसी संघर्ष समिती गोंदियाचे सुनील पटले,राजेश नागरीकर, मोहसीन खान, सईम कुरेशी, सरपंच संघटना गोंदिया जिल्हाध्यक्ष चंद्रकुमार बहेकार, ओमप्रकाश लांजेवार, रवींद्र मेंढे,इर्रीचे माजी उपसरपंच रवी तरोणे, ओबीसी संघर्ष समितीच्या पुष्पा खोटेले, महात्मा फुले समता परिषद महिला आघाडी प्रमुख गायत्री इरले, माजी नगरपरिषद सभापती बंटी पंचबुद्धे, बहुजन युवा मंचचे सुनील भोंगाडे, रवी



तुरकर, मुनेश्वर कुकडे,लिलेश्वर रहागंडाले,नरेश चौधरी, सामाजिक कार्यकर्त्या सविता बेदरकर, गौरव बिसने, देवचंद बिसेन, ओबीसी संघर्ष समिती सालेकसा तालुकाध्यक्ष मनोज डोये, किशोर कोरे, कमल हटवार, हेमंत बिसेन, राकेश पाटील, जिल्हा परिषद सदस्या अश्विनी पटले, जिल्हा परिषद सदस्य संशेद्र भगत,सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे मार्गदर्शक अरुण पारधी,माजी पंचायत समिती सदस्य गुड्डू लिल्हारे,गोंदिया ग्रामीण भाजपचे माजी अध्यक्ष मनोज भांडारकर, गोंदिया शहर भाजप मंडळ अध्यक्ष ऋषिकांत साहू,बाजार समितीचे संचालक उपसभापती राजकुमार पटले, संचालक धनलाल ठाकरे,भटक्या विमुक्त जाती संघर्ष वाहिनीचे परेश दुरुगकर, तिरथ येटरे, भागचंद रहागंडाले, बहुजन समाज पक्षाचे सुनिल भरणे, बालू वंजारी, गिरधारी हत्तीमारे, लोकचंद कापगते, प्रकाश काशीवार,ओम पारधी, चंद्रकांत भोयर,अनिल कोरे, तुकाराम राणे, हिमालय येळे यांच्यासह सकल ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातून संधीचे सोने करा– जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर



**गोंदिया :–**लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची संधी चालून आलेली आहे. लोकांचे आरोग्य,शिक्षण, उपजीविका आणि सामाजिक न्याय क्षेत्रात सहभाग वाढवून संधीचे सोने करा असे आवाहन गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी (ता. ३) केले. गोंदिया जिल्हापरिषदेच्या वतीने येथील जलाराम लान सभागृहात आयोजित कार्यशाळेत श्री भेंडारकर अध्यक्ष पदावरून बोलत होते.मंचावर मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर, उपाध्यक्ष सुरेश हर्षे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, जिल्हा परिषदेच्या सभापती रजनी कुंभरे, दीपा चंद्रकापुरे, पौर्णिमा ढेंगे, गोंदिया पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले, तिरोड्याचे तेजराम चव्हाण, गोरेगावच्या चित्रकला चौधरी, अर्जुनी /मोर च्या आम्रपाली डोंगरवार ,

सालेकसाच्या वीणा कटरे, आमगावच्या योगिता पुंडे, सडक अर्जुनीचे चेतनलाल वडगाये आणि देवरीचे सभापती अनिल कुमार बिसेन उपस्थित होते.

श्री भेंडारकर पुढे बोलताना म्हणाले की, सध्या स्पर्धेचे काळ सुरू आहे, यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या पंचायतराज संस्थांना अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत या अभियानाचा लाभ पोहचविता येईल परिणामी ग्रामीण नागरिकांना सुलभ रीतीने सेवा देणे शक्य होइल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती जाखलेकर म्हणाल्या की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याचा कालावधी शंभर दिवसाचा असून १७ सप्टेंबर रोजी आयोजित ग्रामसभेपासून हे अभियान सुरु होइल ते ३१ डिसेंबर पर्यन्त चालणार आहे. या अभियानाचं वैशिष्ट्य असे की या अभियानात मुख्यमंत्री प्रामुख्याने सहभागी होणार आहेत. या पुरस्कार अभियानात नागरिकांनी सहभागी व्हावे अशी विनंती त्यांनी केली.

उपाध्यक्ष हर्षे म्हणाले की, गोंदिया जिल्ह्यातील तालुके यापूर्वी विविध पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.याची जाणीव सरपंचांनी ठेवून पुनःच आराखडा तय्यार करण्याचा सल्ला त्यांनी दिला. गावांचा विकास साधण्यासाठी अधिकाऱ्यांनी पराकाष्ठा केली पाहिजे,असे ते म्हणाले. याप्रसंगी सभापती श्रीमती ढेंगे,श्रीमती कुंभरे आणि श्रीमती चंद्रिकापुरे यांनीही विचार मांडले.

दरम्यान राष्ट्रीय पंचायत अवॉर्ड अंतर्गत ग्रामपंचायत डव्वा इथं उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सडक अर्जुनीचे सभापती चेतनलाल वडगाये,जि. प. सदस्य डॉ भुणेश्वर पटले, विस्तार अधिकारी वाय. सी पटले. रवींद्र पराते,सरपंच योगेश्वरी चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी सिंधू सूर्यवंशी तसेच तिरोडा पंचायत समितीचे सभापती तेजराम चव्हाण, विस्तार अधिकारी शितेश पटले, सालेकसाचे सभापती वीणा कटरे, जि. प. सदस्य वंदना काळे, विस्तार अधिकारी के. एस. सेंदूरकर, जी. जी. मुनेश्वर, जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे सहाय्यक गट विकास अधिकारी शंकर वैद्य आणि जिल्हा परिषदेच्या कविता राठोड यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. गोंदियाचे गटविकास अधिकारी आनंद पिंगळे, गोरेगावचे एच. आय. गौतम आणि सडक अर्जुनीचे दिलीप खोटेले यांनी पुरस्कार मिळिवण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजनांचे सादरीकरण केलं. महात्मा गांधी आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. हा कार्यक्रम जिल्हापरिषदेच्या ग्रामपंचायत विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला.

दरम्यान उपमुख्य कार्यकारी अधिकारी एम. एम. वासनिक आणि सहाय्यक गटविकास अधिकारी एस. आय. वैद्य यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत ) एम. एम. वासनिक यांनी, संचालन विस्तार अधिकारी (संख्यिकी) वैशाली खोब्रागडे यांनी तर आभार ग्रामपंचायत अधिकारी पृथ्वीराज कोल्हटकर यांनी मानले. या प्रसंगी जिल्ह्यातील जिल्हापरिषद सदस्य, गटविकास अधिकारी,विस्तार अधिकारी,सरपंच आणि ग्राम पंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशश्वितेसाठी सहाय्यक प्रशासन अधिकारी गुणवंत ठाकूर, पंकज पटेल, दिलीप चौधरी, सुनील चव्हाण, श्याम समरीत,ज्ञानेश्वर कानडे,प्रकाश तिराले, जगमोहन माणिकपुरी, रोहित बनसोड, सुनील साखरे, दिनेश काळसर्पे,प्रवीण गौतम, स्वेता रंगारी. मनिषा भुरे,यांनी सहकार्य केले.

# शहिद राणी अवंतीबाई चौकात द्या बस थांबा,सेवानिवृत्त बहु.संस्थेचे निवेदन



**गोंदियाः–** शहरातील रिंग रोडवरील राणी अवंतीबाई चौक महत्वाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. येथून धापेवाडा, तिरोडा, तुमसर, नागपूर येथे एसटी महामंडळातर्फे बसेस चालविल्या जातात. येथे एसटी बसचा थांबा असताना तो तीन महिन्यांपूर्वी बंद करण्यात आला आहे. येथे बस थांबत नसल्याने विद्यार्थी, प्रवासी, रुग्ण व नातेवाईकांना गैरसोयीचा सामाना करावा लागतो आहे. राणी राणी अवंतीबाई चौकातील बस थांबा सुरू करावा, अशी मागणी खाजगी शाळा सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेत्तर बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकारी यांच्या शिष्टमंडळाने ४ सप्टेंबर रोजी येथील आगार व्यवस्थापक येतिश कटरे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र राज्य महामार्ग परिवहन महामंडळाची बस सेवा सुरु झाली तेव्हापासुन तुमसर–रामटेक महामार्गावरील शहरातील रिंग रोड येथील राणी अवंतीबाई चौकात बस थांबा सुरु होता. मात्र काही महिन्यांपासून येथील बस थांबा कोणतेही कारण नसताना बंद करण्यात आला आहे. या परिसरात शाळा, रुग्णालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, बँका आहेत. ग्रामीण भागातील नागरिक, रुग्ण, विद्यार्थी मोठ्या संख्येने येथून येजा करतात. सभोवतालच्या परिसरातील जनतेसाठी एसटीबसने प्रवास करण्यासाठी चौकातील एकमेव बस थांबा सोयीचा आहे. बस थांबा बंद करणे हे नागरिक, रुग्ण व विद्यार्थ्यांसाठी गैरसोईचे झाले आहे. याचा नाहक त्रास रुग्ण, नातेवाई, विद्यार्थी व प्रवाशांना होतो आहे. प्रवासी, पालकांवर आर्थिक भुर्दंड वाढला आहे. नागरिक, रुग्ण, विद्यार्थी यांच्या सोयीच्या दृष्टिने येथील बस थांबा महत्वाचा आहे. यापूर्वीही विविध संघटनांनी राणी अवंतीबाई चौकातील बस थांबा पूर्ववत करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे, मात्र संबंधित विभाग व लोकप्रतिनिधी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप प्रवाश्यांकडून होत आहे. दरम्यान आज ४ सप्टेंबर रोजी पुन्हा खाजगी शाळा सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेत्तर बहुउद्देशीय संस्थेच्या शिष्टमंडळाने आगार व्यवस्थापक येतिश कटरे यांची भेट घेत समस्येशी अवगत करून मागील निवेदनाचे स्मरण करून देत पुन्हा राणी अवंतीबाई चौकातील बस थांबा पूर्ववत करण्याची मागणी निवेदनातून केली. निवेदनाच्या प्रती आमदार विनोद अग्रवाल, आ. विजय रहांगडाले यांना पाठविण्यात आल्या आहेत. शिष्टमंडळात संस्थेचे पदाधिकारी अरुण पारधी, आनंद बिसेन, उदेलाल हनवते, दुधराम राऊत, एस. एम. पटले, भगवानसिंह चव्हाण, मोहनलाल पटले, मुन्नालाल हरिणखेडे उपस्थित होते.

# डव्वा जि.प.क्षेत्राचे सदस्य डॉ.पटले यांचा उत्कृष्ठ सहकार्याबद्दल सत्कार




**गोंदिया:–**ग्रामविकास व पंचायत राज विभाग तसेच जिल्हा परिषद गोंदिया यांच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन ३ सप्टेंबरला येथील जलाराम सभागृहात करण्यात आले होते. या कार्यशाळेत डव्वा जिल्हा परिषद गटाचे सदस्य डॉ.भुमेश्वर पटले यांचा जि.प.क्षेत्रातंर्गत येत असलेल्या डव्वा ग्रामपंचायतीच्या वातावरणीय हवामान बदल उपक्रमात केलेल्या सहकार्यामुळे राष्ट्रीयस्तरावर प्रथम क्रमांक ग्रामपंचायतीला मिळवून देण्यात सहकार्य केल्याबद्दल जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखडेकर ,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी वासनिक,जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे,कृषी व पशसुंवर्धन सभापती यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते.

# ग्रामरोजगार सेवकांचे काम बंद आंदोलन



**अर्जुनी मोरगाव :–** तत्कालीन मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांनी ३ ऑक्टोबर २०२४ रोजी रोजगार सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा जीआर काढला. पण, त्याची अद्यापही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सेवक संघटनेने १ सप्टेंबरपासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत जीआरची अंमलबजावणी केली जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा इशारा ग्रामरोजगार सेविकांनी दिला आहे.

ग्रामपंचायत स्तरावर रोजगार हमी योजनेची कामे सांभाळण्यासाठी सरकारने सन २००६–०७ मध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये एका ग्रामरोजगार सेवकाची ग्रामसभेच्या माध्यमातून निवड केली. गेल्या अनेक वर्षापासून तुटपुंज्या टक्केवारीवर ग्रामरोजगार सेवक या योजनेची कामे सांभाळत आहेत. त्यात त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुद्धा होऊ शकत नाही. संघटनेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे कायमस्वरूपी मानधन मिळण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. सरकारने याची दखल घेऊन मागील काळात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी ग्रामरोजगार हजार व दोन हजार रुपये इतर देण्याचा शासकीय जीआर काढला. मात्र, गेल्या दहा महिन्यांपासून या शासकीय जीआरची अंमलबजावणी शासनस्तरावरून करण्यात आली नाही. गेल्या सहा महिन्यांपासून ग्रामरोजगार सेवकांना एक रुपयाही मानधन मिळालेले नाही.

संपूर्ण महाराष्ट्रात अनेकदा निवेदन देऊन ही समस्या मार्गी लावण्याचे सरकारला कळिवले देखील होते. मात्र, निद्रावस्थेत असलेल्या लोकप्रतिनिधींना जाग केव्हा येणार? असा सवाल केला जात आहे. जीआरची अंमलबजावणी व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सेवक संघटनेने संपूर्ण महाराष्ट्रात १ सप्टेंबरपासून मागण्या पूर्ण होईपर्यंत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा संघटनेचे अध्यक्ष संतोष रोकडे यांनी दिला आहे.

अंमलबजावणी करायची नव्हती तर हा जीआर कशासाठी काढण्यात आला?, असा प्रश्न ग्रामरोजगार सेवकांकडून विचारला जात आहे.

# मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यात येऊ नये तहसिलदारांना निवेदन



**सडक अर्जुनी :–** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्याच्या संभाव्य निर्णयाला तीव्र विरोध दर्शवण्यासाठी जिल्ह्यातील सकल ओबीसी समाज व ओबीसी संघटनाच्यावतीने शासनाला सडक अर्जुनी येथील तहसिलदारमार्फत ४ सप्टेंबरला निवेदन पाठविण्यात आले.

महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २ सप्टेंबर रोजी काढलेला सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या जीआरनुसार हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा–कुणबी किंवा कुणबी–मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबत काढलेला निर्णय हा ओबीसी समाजावर अन्याय करणार आहे. तसेच पुन्हा सरकारने सगेसोयरेंच्या माध्यमातून ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचे काम करीत आहे. तो शासन निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा अशी मागणी निवेदनातून केली आहे.

निवेदन देतेवेळी दिनेश हुकरे, टिकाराम भेंडारकर, गंगाधर परशुरामकर, अरविंद मेंढे, रोशन बडोले, मधुसुधन दोनाडे, देवचंद तरोणे, राजेश कटाणे, राजेश कोरे, स्वप्नील ब्राम्हणकर, अनिल मुनेश्वर हेमराज मेंढे, चिलीया ब्राम्हणकर, किशोर शेंडे, प्रभाकर भेंडारकर, डी.टी.बावनकुळे, पुष्पा खोटेले आदी ओबीसी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# ट्रॅक्टरसह सागवान तस्कर वनविभागाच्या जाळ्यात



**सडक अर्जुनी:–**सहवनक्षेत्र कार्यालयांतर्गत कोयलारी येथे एका सागवान तस्कराला, आरा, ट्रॅक्टरसह अटक करून ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. ही कारवाई ४ सप्टेंबर रोजी वनविभागाने केली. नीलेश हिरालाल मेश्राम रा. कोयलारी असे वनविभागाने ताब्यात घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

सडक अर्जुनी तालुक्यातील शेंडा सहवनक्षेत्रातील सहाकेपार, कोयलारी, पुतळी, सालेधारणी या परिसरात अवैध वृक्षतोडीची चर्चा होती. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी आरोपी नीलेश हिरालाल मेश्राम रा. कोयलारी हा ट्रॅक्टरमध्ये झाडे कापण्याचा लोखंडी आरा, सागवान एक नग १.७८ घनमीटर किंमत अंदाजे ९१ हजार २२८ रुपयांचा मुद्देमाल नेत असताना त्याला रंगेहात पकडले. याप्रकरणी आरोपीवर वन गुन्हा दाखल करून ट्रॅक्टर जप्त केला.

ही कारवाई सडक अर्जुनीचे वनपरिक्षेत्र अधिकारी मिथुन तरोणे यांच्या मार्गदर्शनात सहवनक्षेत्र सहायक वर्षा रहले, वनरक्षक वनिता ब्राह्मणकर, शालू शिवणकर, कोयलारीचे वनरक्षक संजय हटवार, सहाकेपारचे वनरक्षक विवेक काईट, वनमजूर यशवंत शेंडे, चैत्राम खंडाळकर, तेजराम लोखंडे यांनी केली.

# १०४ आदिवासी गावांचा सर्वांगीण विकास



**गोंदिया:–** विकसित भारताच्या निर्मितीसाठी धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान राबविण्यात येत आहे. यामुळे आदिवासी गावांचा सर्वांगीण विकास आणि त्यांचे सक्षमीकरण करण्याचे ध्यय साध्य करता येईल असा ठाम विश्वास जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी व्यक्त केला.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी ते बोलत होते. नायर म्हणाले की भारतातील ३० राज्यातल्या एक लाख गावात हे अभियान राबविण्यात येणार असून सुमारे २० लाख आदिवासीबांधवांना याचा लाभ मिळेल. यासाठी अधिकाऱ्यांनी कामाला लागून गोंदिया जिल्ह्यातही हे अभियान सार्थक करावे असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी प्रभारी मख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर, देवरीचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी उमेश काशीद, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी एम. एम. वासनिक, यांच्यासह १७ विभागाचे विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी देवरीच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी उमेश काशीद यांनी अभियानाची विस्तृत माहिती दिली.

या अभियानासाठी गोंदिया जिल्ह्यातील एकंदर १०४ आदिवासी गावांचा समावेश करण्यात आला असन यामध्ये देवरी तालक्यातील सर्वाधिक ४९ गावांचा समावेश आहे. हे अभियान राबविण्यासाठी गोंदिया जिल्ह्यात, जिल्हा प्रवीण

### आदिवासी विकासासाठी 'आदी अभियान'

**ते अभियान राबविण्यासाठी राज्य गावपातळीवरील सरकारी अधिकाऱ्यांना मआदी कर्मयोगीफ, तर युवा, नेते शिक्षक, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते यांना मआदी सहयोगीफ आणि आदिवासी नेते, स्वयंसेवक, प्रतिष्ठित व्यक्ती यांना मआदी साथीफ संबोधण्यात येणार असून यांच्या सहकार्याने आदिवासी समूहासाठी कार्य करण्यात येणार आहेत. परिणामी राष्ट्रीय प्रमुख मोहिमांशी समन्वय साधण्यासाठी हे अभियान सार्थक ठरेल असे ते म्हणाले. दरम्यान देवरी एकात्मिक आदिवासी प्रकल्पाच्या सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ. सायली चिखलीकर यांनी संचालन करून अभियानाची विस्तृत माहिती दिली. या प्रसंगी जिल्हा प्रवीण प्रशिक्षक यांनीही या अभियानाची माहिती देऊन हे अभियान प्रतिसादात्मक, पारदर्शक आणि जबाबदार नागरिक यांच्या समन्वयातून कसे यशस्वी करता येईल यावर भर दिला.**

प्रशिक्षकांच्या माध्यमातून सुमारे ४० अधिकाऱ्यांना तालुका प्रवीण प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण देण्यात येईल. त्यानंतर प्रत्येक तालुक्यात २ दिवसीय कार्यशाळा होणार आहे. पुढे ग्राम पातळीवरील ४ दिवसीय कार्यशाल कार्यशाळा होणार असून यामध्ये ग्रामविकास आराखडा तयार करून २ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ग्रामसभेत मंजूरी प्रदान करण्यात येईल अशी माहिती काशीद यांनी दिली.

# देवरीत सकल ओबीसी समाजाचे एसडीओंना निवेदन



**देवरीः–** देवरी तालुका सकल ओबीसी समाजाच्यावतीने मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्याच्या संभाव्य निर्णयाला तीव्र विरोध दर्शवण्यासाठी उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड यांच्या मार्फत मुख्यमंत्र्याच्या नावे असलेले निवेदन ४ सप्टेंबरला सादर करुन ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवण्याची मागणी करण्यात आली.

महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २ सप्टेंबर रोजी काढलेला सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या जीआरनुसार हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा–कुणबी किंवा कुणबी–मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबत काढलेला निर्णय हा ओबीसी समाजावर अन्याय करणार आहे. तसेच पुन्हा सरकारने सगेसोयरेंच्या माध्यमातून ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचे काम करीत आहे. तो शासन निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा अशी मागणी निवेदनातून केली आहे.

निवेदन देतेवेळी देवरी तालुका सकल ओबीसी समाजाचे प्रतिनिधी आर.एस.गायधने, प्रभाकर दोनोडे, युगेशकुमार बिसेन,चंद्रकुमार बहेकार,राजेश भुते,ज्योतिबा धरमशहारे,संतोष भुते,रघुराम वाडीभस्मे,गजानन शिवणकर,कृष्णा ब्राम्हणकर,झेड. बी.दोनोडे,रामकिशन उईके आदी ओबीसी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.